❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती सोमवार, दि. ९ नोव्हेंबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : ३१४ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

निःपक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



थोडक्यात...

.., अन्यथा 1 लाख शेतकऱ्यांचा धडक मोर्चा

सोलापूर : दैनिक संध्या

सोलापूर जिल्ह्यात ऊसाला 16 नोव्हेंबर पर्यंत 3600 चा भाव जाहीर करावा अन्यथा सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर एक लाख शेतकऱ्यांचा धडक मोर्चा काढण्यात येईल असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी दिला आहे. आज पंढरपूरमध्ये आयोजीत करण्यात आलेल्या बैठकीत ते बोलत होते. आज दिवाळीचा पहिला दिवस असूनही शेकडो शेतकरी राजू शेट्टी यांच्या बैठकीसाठी उपस्थित होते. सोलापूर जिल्ह्यातील ऊस उत्पादकांना पहिली उचल 3600 रुपये, कारकाना बंद झाल्यावर 100 रुपये पुढील हंगाम सुरु होण्याआधी 200 व साखरेचा दर 45 रुपयांच्या पुढे गेला तर 70/30 फॉर्म्युल्यानुसार दर जाहीर करण्याची मागणी शेट्टींनी केली. सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखानदारांनी 3100 दर जाहीर केला आहे तो आम्हाला कदापी मान्य नाही. साखर उताऱ्यानुसार प्रति टन पहिली उचल 3600 रुपये जाहीर करावी, असा इशारा शेट्टींनी साखर कारखानदारांना दिला. दरम्यान उद्यापासून सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आपल्या ऊस तोडी बंद कराव्यात असं आव्हान राजू शेट्टी यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना केले आहे.

दिवाळीनिमित्त शेअर बाजारात 1 तासाचे ट्रेडिंग

मुंबई : दैनिक संध्या

दिवाळीनिमित्त आज शेअर बाजारात शुभ व्यवहार होत आहेत. सेन्सेक्स २०० अंकांनी वाढून सुमारे ८१,२०० अंकांवर व्यवहार करत आहे. निफ्टी ४० अंकांनी वाढून २५,०५० अंकांवर पोहोचला आहे. रविवारची सुट्टी असूनही, विशेष व्यवहार सत्र एक तास चालणार आहे. आजच्या व्यवहारात धातू आणि औषधनिर्माण क्षेत्रातील शेअर्समध्ये सर्वाधिक खरेदी झाली. सेन्सेक्समधील ३० शेअर्सपैकी १८ शेअर्स वधारले, तर १२ घसरले. सन फार्मा आणि टाटा स्टील हे सर्वाधिक वाढलेले शेअर्स होते, तर इंडिगो आणि इन्फोसिस हे सर्वाधिक घसरलेल्या शेअर्सपैकी होते. नॅशनल स्टॉक एक्सचेंजमधील चित्र. आज दुपारी २:२० वाजता घंटा वाजवून मुहूर्त व्यापाराला सुरुवात झाली. भारतीय बाजारात मुहूर्त ट्रेडिंग दिवाळीच्या संध्याकाळी लक्ष्मीपूजनाच्या वेळी होत असे. मात्र, व्यापारी आणि गुंतवणूकदारांच्या विनंतीनंतर गेल्या वर्षापासून ही व्यवस्था बदलण्यात आली आहे. गेल्या वर्षी मुहूर्त ट्रेडिंग दुपारी 1:45 ते 2:45 वाजेपर्यंत झाले होते. मुहूर्त ट्रेडिंगच्या गेल्या 5 वर्षांत तेजीचा कल राहिला आहे, जो 1% च्या आतच राहिला. 2022 मध्ये मुहूर्त ट्रेडिंगदरम्यान बाजारात सर्वाधिक 0.87% वाढ झाली होती.

फळबागांसाठी बोअरवेल खोलीकरणावरील बंदी 15 डिसेंबरपर्यंत उठवली; मुख्यमंत्री फडणवीसांची घोषणा


■ मुंबई (दै. संध्या)

शेतकऱ्यांच्या फळबागांचे नुकसान टाळण्यासाठी बोअरवेलच्या खोलीकरणावरील बंदी 15 डिसेंबरपर्यंत सशर्त उठवण्याचा महत्त्वाचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केला असून, बोअरवेल फ्लशिंगलाही कायमस्वरूपी परवानगी दिली आहे. यासोबतच, काल रात्री आणि आज सरपंच तसेच शेतकऱ्यांसोबत झालेल्या सविस्तर चर्चेनंतर त्यांच्याकडून आलेल्या शेती, रस्ते आणि गावांच्या विविध प्रश्नांसंबंधीच्या निवेदनांची गंभीर दखल घेत, त्यावर सकारात्मक आणि तातडीने कारवाई करून बळीराजाला जास्तीत जास्त मदत करण्याचे आश्वासनही फडणवीस यांनी दिले आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, त्या फळबागांना आपण वाचवलं नाही तर ही झाडं पुन्हा त्या लेव्हलला येण्याकरता दहा बारा वर्ष लागतात आणि म्हणून अशा भागांमध्ये जिथे काही काळापर्यंत ही बंदी उठवणं शक्य आहे त्या ठिकाणी आम्ही ती उठवणार आहोत. ही सरसकट उठवली जाणार नाहीये. फक्त ज्या ठिकाणी शेतकऱ्यांच्या फळबागा आहेत त्याच ठिकाणी ही बंदी 15 डिसेंबरपर्यंत आम्ही उचलणार आहोत. त्याच्यावरही प्रशासनाची करडी नजर असेल प्रशासनाची कारण आपल्याला भूगर्भातलं पाणी हे पुरवायचं आहे आणि मे महिन्यापर्यंत आपल्याला ते पुरवायचं आहे. त्यामुळे एक खास बाब म्हणून फळबागा वाचवण्याकरता हा निर्णय आपण घेतलेला आहे.

नवीन बोअरवेलबद्दल हे राहणार आहे की फ्लशिंग? यावर उत्तर देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, फ्लशिंग हे पर्मनंट अलॉव आहे. फ्लशिंग कधीही करता येतं फ्लशिंगवर बंदी नाहीच. केवळ खोलीकरणावर बंदी आहे तीही काही काळ आपण उचलतो. यासाठी परवानगी घ्यावी लागेल.

खूप सारे निवेदनं तुमच्यापर्यंत पोहोचलेले आहेत. हे निवेदनं मार्गी कसे लागणार आहेत? काय काय समस्या प्रामुख्याने होत्या? यावर प्रतिक्रिया देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुळामध्ये आपल्याला कल्पना आहे की काल रात्री आपण शेतकऱ्यांसोबत चर्चा केली आणि आज तालुक्यातले सरपंच आपण बोलावले होते. त्या सगळ्या सरपंचांसोबत आपण चर्चा केली. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रश्न, गावांचे प्रश्न, शेतीचे प्रश्न, रस्त्यांचे प्रश्न, पाणंदचे प्रश्न, तलावांचे प्रश्न असे विविध प्रश्न आपल्यासमोर आले. त्यातले बरेचशे प्रश्न हे मार्गी



लागण्यासारखे आहेत. काहींच्या योजना तर ऑलरेडी घोषित झालेल्या आहेत. काही ठिकाणी पालकमंत्री आणि आमदारांनी त्याला मान्यताही दिली आहे. त्यामुळे आता आलेली सगळी निवेदनं जी आहेत त्या निवेदनांवर आम्ही कारवाई करू. काही चांगल्या सूचना या ठिकाणी आलेल्या आहेत. त्या सूचनांची आपल्याला अंमलबजावणी कशी करता येईल हा देखील आपण प्रयत्न करू. पण आपण बघितलं असेल काल रात्री बघितलं असेल आणि आजही बघितलं असेल तर अतिशय पोटतिडकीने शेतकऱ्यांनी आणि सरपंचांनी आपले विषय मांडलेले आहेत. आम्ही सगळ्यांचे विषय ऐकून घेतलेत कुणालाही अडवलं नाही. सगळं शांतपणे ऐकून घेऊन सगळ्यांची निवेदनं घेऊन त्यात जास्तीत जास्त जो मार्ग काढता येईल जी मदत करता येईल ती करण्याचा आमचा प्रयत्न असेल, असे आश्वासन फडणवीसांनी दिले.

शेतकऱ्याच्या घरी काल तुम्ही साधेपणाने जेवण केलं, खाली बसून, सारवलेल्या अंगणात, रात्र घालवली, दिवाळी साजरी केली. अनुभव कसा होता? आणि पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी तुमचं कौतुक केलेलं आहे, यावर प्रतिक्रिया देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, मी पहिल्यांदा तर रामभाऊ बालपांडे आणि अरुणाताई बालपांडे यांचे मनापासून आभार मानतो की त्यांनी आमचं खूप चांगलं आगतस्वागत त्या ठिकाणी केलं. अतिशय उत्तम जेवण आम्हाला त्या ठिकाणी दिलं. आज न्याहारी पण अगदी चांगली दिली. आणि संपूर्ण कुटुंबाशी एक अत्यंत चांगली जवळीक तयार झाली. त्या ठिकाणी त्यांची नात आहे नारायणी ती पण अतिशय गोड आहे तिच्यासोबतही आमची मैत्री झाली आहे. त्यांच्याहीकडे यावेळी दुष्काळाचा खूप मोठा परिणाम झालाय. झाडांवरही झालेला आहे, संत्र्यावर देखील परिणाम झालाय आणि कापूस सोयाबीनवर देखील परिणाम झालेला आहे. एक समाधानाची बाब मला त्या ठिकाणी दिसली की त्यांचे सगळे मिळून ते तीन खातेदार आहेत, त्या तिन्ही खातेदारांचं कर्ज जे आहे त्या कर्जमाफीचा लाभ त्यांना मिळाला आणि त्यांचं कर्ज त्या ठिकाणी माफ झालेलं आहे. त्यावर त्यांनी समाधान व्यक्त केलं. आणि एक लढण्याची जिद्द त्यांच्यामध्ये मला पाहायला मिळाली. सगळ्यात महत्त्वाचं आहे की हा जो परिवार आहे ज्यांच्यामध्ये मी गेलो होतो, हा संपूर्ण परिवार वारीला जाणारा परिवार आहे. ते जे अरुणाताईंचे बंधू आहेत ते स्वतः दिंडी घेऊन त्या ठिकाणी आषाढीला जातात. त्यामुळे अतिशय भाविक अशा प्रकारचा परिवार आहे. आणि निश्चितपणे आपल्याला माहिती आहे की विठ्ठलाची अर्चना करणारे जे शेतकरी आहेत ते सगळे शेतकरी कितीही विपरीत परिस्थिती असली तरी त्याचा सामना करतात. त्यामुळे मला देखील त्यांच्याकडे राहून खूप उभारी पण मिळाली, आत्मविश्वास पण मिळाला. एक प्रकारे मला असं वाटतं की खूप गोष्टी त्यांच्याकडून शिकायला पण मिळाल्या. आणि त्यांच्या घरी राहण्यात मला अतिशय आनंद आला, झोप छान लागली.

पश्चिम बंगाल SIR न्यायाधिकरणात सलग चौथ्या न्यायाधीशांचा राजीनामा

■ कलकत्ता (दै. संध्या)

कलकत्ता उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश विश्वजित बसू यांनी पश्चिम बंगाल एसआयआर न्यायाधिकरणातून राजीनामा दिला आहे. त्यांनी वैयक्तिक कारणांचा हवाला दिला आहे. राजीनामा देणाऱ्या १९ निवृत्त न्यायाधीशांपैकी बसू हे चौथे आहेत. न्यायमूर्ती बसू आणि निवृत्त न्यायाधीश इंद्रजित चॅटर्जी हे मुर्शिदाबाद जिल्ह्यातील प्रकरणे हाताळत होते. एका महिन्याच्या आत त्यांच्या जाण्यामुळे तेथील मतदार अपीलांची प्रक्रिया अक्षरशः थांबली आहे.

यापूर्वी, कलकत्ता उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती टी. एस. शिवज्ञानम, निवृत्त न्यायाधीश रणजित कुमार बाग आणि इंद्रजित चॅटर्जी यांनी राजीनामा दिला आहे. पीटीआय या वृत्तसंस्थेने सूत्रांच्या हवाल्याने म्हटले आहे की, बसू यांनी शुक्रवारी एका पत्राद्वारे कलकत्ता उच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांना आपल्या निर्णयाची माहिती दिली.

निवडणूक आयोगाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, निवृत्त न्यायाधीशांच्या राजीनाम्याचा मुर्शिदाबादमधील अपीलांच्या प्रक्रियेवर परिणाम होऊ शकतो, जिथे मोठ्या संख्येने मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत. बासू यांच्या राजीनाम्यामुळे एसआयआर न्यायाधिकरणाबाबतची अनिश्चितता आणखी वाढली आहे. ते म्हणाले, "दोन्ही न्यायाधीशांनी एका महिन्याच्या आत राजीनामा दिला आहे. यामुळे मतदार अपीलांच्या निकालाची प्रक्रिया अक्षरशः थांबली आहे. यामुळे प्रलंबित खटले निकाली काढण्याच्या न्यायाधिकरणाच्या क्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते."

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर निवडणूक आयोगाने मार्च महिन्यात पश्चिम बंगालसाठी 19 अपीलीय न्यायाधिकरणे स्थापन केली. एसआयआरमुळे, "तार्किक विसंगती" यासह विविध कारणांचा हवाला देत, पश्चिम बंगालच्या मतदार यादीतून अंदाजे 91 लाख मतदारांची नावे वगळण्यात आली. ज्या लाखो मतदारांची नावे वगळण्यात आली होती, त्यांच्या अपीलांवर ही न्यायाधिकरणे सुनावणी घेत आहेत.

मोठ्या संख्येने नावे वगळल्यामुळे आणि त्यानंतर दाखल झालेल्या अपीलांना प्रतिसाद म्हणून, सर्वोच्च न्यायालयाने मार्चमध्ये ईआरओ/एईआरओ यांच्या जागी तपास करण्यासाठी 700 न्यायिक अधिकाऱ्यांची (बंगाल, ओडिशा आणि झारखंडमधून) नियुक्ती करण्याचे आदेश दिले.

फराळ तिथेच बनलाय की कलेक्टरांनी डब्बे पाठवले? मुख्यमंत्र्यांच्या शेतकरी दौऱ्यावर संजय राऊतांचा सवाल

■ मुंबई (दै. संध्या)

मुख्यमंत्री ज्या शेतकऱ्याच्या घरी फराळ करत आहे तो नेमका त्याच शेतकऱ्याच्या घरी झाला आहे की कलेक्टरांनी मागच्या दाराने डब्बे पाठवले असा सवाल खासदार संजय राऊत यांनी केला आहे. तर हे सर्व आम्ही अनुभवले आणि पाहिलेले आहे. तरीपण हा शेतकऱ्यांच्या घरी जात दिवाळी साजरी करणं उपक्रम चांगला आहे.

संजय राऊत म्हणाले की, भाजपला सत्तेच्या शिखरावर पोहचवण्याचं काम बाळासाहेब ठाकरे आणि लालकृष्ण आडवानी यांनी केले. अडवाणींच्या रथावर स्वार होऊन भाजप दिल्लीच्या तख्तावर पोहचली आहे. त्याच अडवाणींना भाजपने मोदी,शहा, फडणवीस यांनी बारा वर्षे वनवासात पाठवले. लालकृष्ण अडवाणी मौनात आहेत. 12 वर्षांत त्यांचा छळ केला. मानसिक यातना केल्याचा आरोप राऊतांनी केला आहे.

संजय राऊत म्हणाले की, गोकुळमध्ये सरकारला रस नसता तर त्यांनी असे बेकायदा संचालक नेमले नसते. हसन मुश्रीफ यांना फायदा व्हावा, त्यांच्या मुलांना संचालक होता यावे म्हणून राज्यपालांकडून आदेश काढण्यात आला आहे. तुम्हाला रस नसता तर लोकशाहीने दिलेला कौल तुम्ही मान्य केला असता. हसन मुश्रीफ यांचे पॅनल



पराभूत झाले असून तिथे सतेज पाटलांचे पॅनल विजयी झाले आहे, हे मुख्यमंत्र्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. सतेज पाटलांच्या निवडून आलेल्या दोन जागा निवडणूक आयोगावर दबाव आणून पराभूत करण्यात आल्या आहेत.

संजय राऊत म्हणाले की, मुख्यमंत्री आणि सर्व मंत्री शेतकऱ्यांच्या घरी जात दिवाळी साजरी करणार आहेत त्यांची संकल्पना चांगली आहे. राज्यात दुष्काळ असल्याने शेतकरी अस्वस्थ आहे. मुख्यमंत्र्यांची कल्पना जरी चांगली असली तरी त्यांनी आता जाऊन पाहिले पाहिजे की त्यांनी जे 5 हजार रुपये दिले आहेत दिवाळी साजरी करण्यासाठी त्यामध्ये खरोखर दिवाळी साजी होईल का? हे त्यांना शेतकऱ्यांच्या घरी आणि बांधावर गेल्यावर कळेल. शेतकऱ्याच्या घरी दिवाळी साजरी केली म्हणून मुख्यमंत्र्यांवर टीका करण्यात काही अर्थ नाही.

संजय राऊत म्हणाले की, सरकार शेतकऱ्यांबरोबर आहे हे दाखवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. पण शेतकऱ्यांच्या घरी 1 दिवसाची दिवाळी साजरी करत शेतकऱ्यांचे प्रश्न संपणार नाही आणि दुःख सुद्धा कमी होणार नाही. त्यासाठी त्यांच्या बांधावर जावे लागेल.

संजय राऊत म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सैनिकांसोबत दिवाळी साजरी करत आहेत पण त्यांच्या या दिवाळी साजरी करण्याने चीनची घुसखोरी थांबत नाही ना? त्यामुळे पुलवामा आणि पहलगाम सारखे हल्ले थांबत नाही ना. दिवाळी साजरी करण्याचा एक दिवसाचा कार्यक्रम असतो पुढे काय? असा सवाल राऊत यांनी केला आहे. मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या घरी जात दिवाळी साजरी केली यामध्ये नवीन असे काय आहे? यापूर्वीही असे वेगवेगळे उपक्रम इतर मुख्यमंत्र्यांकडून करण्यात आले आहेत.



राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चांना वेग! पार्थ पवार सलग दुसऱ्या दिवशीही शरद पवारांच्या भेटीला

■ मुंबई (दै. संध्या)

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष, ज्येष्ठ नेते शरद पवार यांना शनिवारी (7 जानेवारी) मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. त्यानंतर ते त्यांच्या 'सिल्व्हर ओक' या निवासस्थानी परतले. रुग्णालयातून घरी परतल्यानंतर त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी अनेक नेते आणि पदाधिकारी त्यांची भेट घेत आहेत. याच दरम्यान काही राजकीय घडामोडींनी वेग घेतल्याचे चित्र आहे.

पार्थ पवार यांच्या सलग दोन दिवसांच्या भेटी आणि रुग्णालयात प्रफुल्ल पटेल यांनी घेतलेली भेट, यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाच्या चर्चांनी पुन्हा एकदा जोर धरला आहे. अजित पवार गट आणि शरद पवार गट पुन्हा एकत्र येणार का, याविषयी राजकीय वर्तुळात अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत.

या विलीनीकरणाच्या चर्चांबाबत एग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे प्रमुख राजेंद्र पवार यांना विचारले असता, त्यांनी सावध प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, मी याबाबत फारसे ऐकलेले नाही. पवारसाहेब आजारी असताना प्रफुल्ल पटेल यांनी तिथे जाऊन काहीतरी चर्चा केल्याचे समजते. पण यावर माझे, रोहितचे, पवारसाहेबांचे किंवा सुप्रिया सुळेंचे वैयक्तिक मत वेगळे असू शकते. त्यामुळे सध्यातरी या मतांना फार महत्त्व नाही.

विलीनीकरणाच्या शक्यतेवर बोलताना राजेंद्र पवार पुढे म्हणाले, दोन्ही पक्ष खरोखर विलीन होणार आहेत का? विलीन झाले तर ते भाजपला साथ देणार आहेत का? याबद्दल मला काहीही माहिती नाही आणि अजून काही स्पष्टही झालेले नाही. पण जर विलीनीकरण ठरलेच असेल, तर 10 तारखेला (जानेवारी) या गोष्टी स्पष्ट होतील असे ऐकण्यात आहे. विलीनीकरण कसे असेल आणि सत्तेत सहभाग असणार की नाही, हे पक्षाचे प्रमुखच सांगू शकतील.

महाराष्ट्रात रोज 8 शेतकऱ्यांची आत्महत्या, हा आकडा भयानक

नेत्यांच्या फायद्यासाठी डेटा सेंटर लादू नका, रोहित पवारांचा सरकारवर हल्लाबोल

■ सोलापूर (दै. संध्या)

एआय डेटा सेंटरमुळे ट्रम्प यांच्या पक्षाचा अमेरिकेत पराभव झाला आहे. तिथल्या लोकांनी सुद्धा या प्रकल्पाला नाकारले आहे. हा प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणात पाणी, लाईटचा वापर केला जातो, आणि त्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होत नाही, आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी म्हटले आहे.

रोहित पवार म्हणाले की, सोलापूरच्या पालकमंत्र्यांनी पाण्याचे नियोजन न केल्याने सर्व पाणी कर्नाटकमध्ये गेले आहे. इथे लोकांना पिण्याचे पाणी सुद्धा मिळणार नाही. ऊजणीतच पाणी राहिले नाही तर लोकांना पाणी मिळणार कुठून? असा सवाल पवारांनी केला आहे. केवळ नेत्यांना सपोर्ट करण्यासाठी एआय डेटा सेंटरचे समर्थन जर भाजपचे नेते करत असतील तर ते फार घातक आहे. सोलापूरचा एक जण डेंटा सेंटरमध्ये गुंतवणूकदार असून सर्व नेते त्यांच्या जवळ आहेत.

रोहित पवार म्हणाले की, हे गेंड्याच्या कातडीचे सरकार आहे, लोकांच्या बाबतीमध्ये कमी आणि राजकारणाचा जास्त विचार करणारे हे सरकार आहे. शेतमजूर जर अडचणीत असतील तर रस्त्यावरची लढाई लढण्याची शक्ती स्वामींनी आम्हाला देवो हीच प्रार्थना आम्ही केली आहे. आम्ही लढल्यानंतर यशसुद्धा मिळो. ऊजनीमध्ये जो डेटा सेंटरचा प्रकल्प येणार आहे त्यामध्ये दीड



लाख कोटी रुपयांची गुंतवणूक असून त्यातून केवळ 400 रोजगार मिळणार आहेत. गुजरातमध्ये मोठ्या प्रमाणात उत्पादन प्रकल्प सुरू होत आहे तिथे सहा लाख लोकांना रोजगार मिळणार आहे असे प्रकल्प तुम्ही महाराष्ट्रात दिले पाहिजे.

रोहित पवार म्हणाले की, महाराष्ट्रात दिवसाला 8 शेतकरी आत्महत्या करत आहेत. त्यामुळे हा आकडा भयानय आहे. शेतकऱ्यांना सांगू इच्छितो की आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांचे मोठे हाल होतात. कर्त्या व्यक्तीने आत्महत्या केली तर आई-वडीलांसह पत्नी आणि मुले उघड्यावर पडतात, त्यांना अनेक प्रश्न भेडसावत असतात. त्यामुळे शेतकऱ्यांनी आत्महत्येचा विचार करू नये. शेतकरी एकत्र आले तर सरकारला झुकावेच लागेल. मुख्यमंत्री शेतकऱ्यांच्या घरी गेले चांगली गोष्ट आहे. पण नुसते शेतकऱ्यांच्या घरी जाऊन काही होणार नाही. तर शेतकऱ्यांना हेक्टरी 1 लाख रुपयांची मदत करणे गरजेचे आहे. अतिवृष्टीचे 17500 रुपयांची मदत अजून मिळेलेली नाही. शेतमजूरांना मदत केली पाहिजे. तर मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली पाहिजे. दिखावा करण्यापेक्षा लोकांना न्याय कसा देता येईल याकडे सरकारने लक्ष दिले पाहिजे.

रोहित पवार म्हणाले की, दिवाळी साजरी करत असताना अडचणीत असणाऱ्या लोकांसोबत दिवाळी साजरी करणं गरजेचे आहे, असे वाटल्याने आम्ही त्यांच्यासोबत दिवाळी साजरी करत आहोत. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातील काही भागातील शेतकरी आणि शेत मजूर यांच्यासोबत दिवाळी साजरी करत आहोत. माध्यमांच्या सहाय्याने लोकांच्या अडचणी सरकारपर्यंत जाव्यात हा आमचा प्रयत्न आहे.

रोहित पवार म्हणाले की, पालकमंत्री त्यांच्या सर्व बैठका 'बालाजी सरोवर'मध्ये घेतात. ते सकाळ, दुपार, संध्याकाळ कष्ट करत आहेत. जास्त कष्ट केल्यावर माणसाला गोळ्या खाव्या लागतात, मी एवढेच बोललो, असा चिमटा त्यांनी सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांना काढला आहे. अक्कलकोटमधील नागरिकही पाण्याच्या समस्येवर बोलत असून पालकमंत्र्यांनी पाण्याचे कोणतेही नियोजन केले नसल्याची टीका त्यांनी केली.

रोहित पवार म्हणाले की, त्यांच्या पक्षात अंतर्गत वाद असतील तर त्यावर मी काय बोलणार. अजित पवारांना दोन्ही कुटुंबे एकत्र असावीत असे वाटत होते. मात्र, दादांच्या निधनानंतर सुनील तटकरे यांनी अवघ्या 10 दिवसांत राजकारण सुरू केले. दादा असते तर कदाचित विलीनीकरण झाले असते. तसेच, शरद पवार आजारी असल्याने काही लोक त्यांच्या भेटीला आले होते, मात्र काहींनी त्याला जाणीवपूर्वक राजकीय चर्चेचा रंग दिला. त्यातून काहीही निष्पन्न होणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

संपादकीय

असत्यावर सत्याचा विजय होऊ दे!...

दिवाळी म्हणजे अंधारावर प्रकाशाचा, निराशेवर आनंदाचा, आणि असत्यावर सत्याचा, विजय साजरा करणारा मांगल्याचा सण!.. लखलखत्या पण त्याच्या प्रकाशात घराघरात सुख समृद्धी आणि ऐश्वर्याची प्रार्थना केली जाते. दीपावलीतील सर्वात महत्त्वाचा धार्मिक सोहळा म्हणजे लक्ष्मीपूजन!... अश्विन अमावस्येच्या सायंकाळी लक्ष्मीपूजन करण्याची परंपरा आहे. धन, वैभव, संपत्ती, आणि समृद्धीचे प्रतिक,असलेल्या महालक्ष्मीची या दिवशी मनोभावे पूजा केली जाते. भगवान विष्णूने बळीराजाच्या बंदिवासातून लक्ष्मीची मुक्तता केल्याची पौराणिक आख्यायिका या सणाशी जोडली जाते. देवी लक्ष्मीच्या कृपेने घरात सुख, समृद्धी नांदावी, व्यवसायात भरभराट व्हावी,आणि वर्षभर धनधान्याची कमतरता भासू नये.या श्रद्धेने प्रत्येक घरात लक्ष्मीपूजन केले जाते. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी नवीन केरसुणी खरेदी करून तिला हळद, कुंकू, फुले, वाहून तिची पूजा करण्याची परंपरा आहे. केरसुनीच्या माध्यमातून घरातील अस्वच्छता, आणि अलक्ष्मी दूर करून लक्ष्मीचे स्वागत केले जाते. अशी लोकमान्यता आहे. त्यामुळे अलक्ष्मीचे उच्चाटन, आणि लक्ष्मीचे पूजन, हा या दिवसाचा विशेष भावार्थ मानला जातो. हिंदू धर्म परंपरेत अमावस्येच्या रात्री लक्ष्मीपूजनाला विशेष महत्त्व आहे. चंद्राची कला अमावस्ये नंतर हळूहळू वाढत जाते. त्याचप्रमाणे घरातील धन, वैभव, सुख आणि समृद्धी दिवसेंदिवस वृद्धिगत व्हावी, अशी यामागील धार्मिक भावना आहे. अमावस्येच्या संध्याकाळी देवी लक्ष्मी आपल्या भक्ताच्या घरी आगमन करून सुख समृद्धीचा आशीर्वाद देते. अशी श्रद्धा आहे. त्यामुळे घराची स्वच्छता करून दिव्याची रोषणाई, आणि रांगोळ्यांनी सजावट करून लक्ष्मीचे स्वागत केले जाते. बलिपदा अर्थात दिवाळी पाडवा कार्तिक शुद्ध प्रतिपदा हा दिवस बलिप्रतिपदा किंवा दिवाळी पाडवा म्हणून साजरा केला जातो.\भगवान विष्णूने वामन अवतार धारण करून बळीराजाला पाताळात स्थान दिले. त्याच्या प्रार्थनेवरून वर्षातून एकदा पृथ्वीवर येण्याची वरदान दिल्याची आख्यायिका सांगितली जाते. या दिवशी बळीराजा,आणि त्याची पत्नी विद्यावली यांचे पूजन करण्याची परंपरा आहे. यंदा मंगळवार १० नोव्हेंबर रोजी बलिप्रतिपदा साजरी होणार आहे. दिवाळी म्हणजे केवळ दिव्याची आरास नव्हे, ती माणसा -माणसातील जिव्हाळ्याला उजाळा देणारी, नात्यांच्या विझू पाहणाऱ्या वाती पुन्हा प्रज्वलित करणारी, आनंद पर्वणी आहे. अंधारातून प्रकाशाकडे, निराशेतून आशेकडे, आणि दुःखाच्या सावलीतून सुखाच्या उंबरठ्याकडे नेणारा हा मंगलोत्सव आहे. "दुरिताचे तिमीर जावो, विश्व स्वधर्म सूर्य पाहो" ही संत ज्ञानेश्वराची विश्व कल्याणाची प्रार्थना जणू दिवाळीच्या प्रत्येक पणतीतून त साकार होते. अंगणातील रांगोळी, दाराशी डोलणारा आकाश कंदील, उटण्याचा सुगंध, फराळांचा दरवळ, आणि आप्तेष्टांच्या भेटीने खुलणारे चेहरे,या वातावरणातून जगण्याला नवी उमेद मिळते. काळोख कितीही गडद असला तरी त्याला आव्हान देण्यासाठी इवलीशी ज्योतही पुरेशी असते. हा विश्वास दिवाळी जागवते, दिवाळी हा केवळ आनंद साजरा करण्याचा नव्हे तर जगण्यावरचा विश्वास अधिक दृढ करण्याचा उत्सव आहे. वसुबारसेच्या कृतज्ञतेपासून धनत्रयोदशीच्या समृद्धी पर्यंत, नरक चतुर्दशीच्या अभ्यंग स्नानापासून लक्ष्मीपूजनाच्या आराधने पर्यंत, आणि बलिप्रतिपदेपासून भाऊबीजेच्या मायेपर्यंत, दिवाळीचा प्रत्येक दिवस भारतीय संस्कृतीतील एखादे सुंदर मूल्य जपतो. धनत्रयोदशीला सोने चांदीच्या खरेदीने सराफाच्या पेढ्या गजबजतात.साडेतीन मुहूर्तापैकी शुभमुहूर्त मानला जाणाऱ्या दिवाळी पाडव्याला नव्या घराची स्वप्न साकार होतात. नव्या वाहनाचे स्वागत होते. नव्या व्यवसायाचा श्री गणेशा होतो,बाजारपेठा फुलतात, घराघरात समृद्धीची स्वप्न रंगतात, दारावर उमटणारी लक्ष्मीची पावले आपल्या आयुष्यात सुख समाधान घेऊन यावीत, अशी प्रत्येकाची मनोकामना असते. मात्र या उत्सवाच्या झगमगटामागे असंख्य कष्टकरी हाताचे योगदान दडलेले असते. हे विसरून चालणार नाही. दारातील फुलाच्या तोरणाला शेतकऱ्यांच्या घामाचा गंध असतो, फराळाच्या गोडव्यात शेतमजूराच्या श्रमाची चव असते, नव्या वस्त्राच्या रंगात विणकारांचे कौशल्य, तर सजावटीच्या वस्तूमध्ये कारागिराची कलाकुसर, सामावलेली असते.

आपल्या घरातील प्रत्येक दिव्याच्या उजेडामागे कोणाच्यातरी कष्टाची कहाणी असते, आपल्या आनंदाला कुणाच्या तरी श्रमाचा आधार असतो. मात्र यंदा या आनंद उत्सवाला दुष्काळाच्या वेदनेची किनार आहे. पावसाने पाठ फिरवल्याने अनेक शिवारातील हिरवी स्वप्ने करपली आहेत. खरीप हंगामातील नुकसानीने शेतकऱ्यांच्या आशा मातीमोल झाल्या, त्या मातीतून सोन्यासारखे पीक उगवायचे?त्या मातीला भेगा पडल्या आहेत?विहिरीचा तळ दिसू लागला आहे, तर उद्याची चिंता आधी खोलवर गेली आहे. दिवसभर शिवारात राबून घरी परतताना शेतकऱ्याची पावले जड होतात.

दुष्काळ केवळ जमिनीतील ओलावा आटवत नाही, तर माणसाच्या जगण्यातील आनंदही शोषून घेतो. शिवारातील पिकाबरोबर माणसाच्या मनातील मनातील आशाही करपवून टाकतो. एका बाजूला बाजारपेठामध्ये सोन्या चांदीची झळाळी, व नव्या वाहनाची रेलचेल खरेदीचा उत्साह आहे, तर दुसरीकडे शेतकऱ्यांच्या घरात उद्याची चूल कशी पेटवायची? अशी विवंचना आहे. यंदा लक्ष्मी पुजनाच्या रात्री आपण दिवे लावू, दारे सजवू, सुख समृद्धीची प्रार्थना करू,पण त्याच वेळी आपल्या शेतकरी अन्नदात्याला संकटात इकडे एकटे पडू न देण्याचा संकल्प करू, दारातील आकाश कंदील उंच झळकत राहो, पण त्याचा प्रकाश शेजारच्याही उपेक्षितांच्या उंबरठ्यावर पडावा, "असत्याचा पराजय होऊन सत्याचा विजय व्हावा" हीच प्रार्थना! ....शुभ दिपावली!...

एक हात मदतीचा... खरोशीतील गरजू कुटुंबांची दिवाळी झाली 'गोड'!

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद; आमदार महेश लांडगे यांचा पुढाकार

■ पिंपरी-चिंचवड (दै. संध्या)

दिवाळीच्या आनंदापासून समाजातील कोणतेही कुटुंब वंचित राहू नये, या भावनेतून भोसरी विधानसभा मतदारसंघाचे भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने खरोशी गावातील गरजू कुटुंबांना मदतीचा हात देण्यात आला. दुष्काळी परिस्थिती आणि आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या कुटुंबांना सणासुदीच्या काळात दिलासा मिळावा, यासाठी अन्नधान्याच्या किटचे वाटप करण्यात आले. पुण्यातील मुकुल माधव फाउंडेशन आणि भारतीय जनता पार्टी, भोसरी विधानसभा यांच्या सहकार्याने 'एक हात मदतीचा' हा सेवाभावी उपक्रम राबविण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत, आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या कुटुंबांच्या पाठीशी उभे राहण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. दिवाळीच्या तयारीत घरखर्चाची जुळवाजुळव करताना अनेक गरजू कुटुंबांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत त्यांच्या दैनंदिन गरजा लक्षात घेऊन अन्नधान्याच्या स्वरूपात मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला. या मदतीमुळे संबंधित कुटुंबांच्या घरखर्चाला काही प्रमाणात हातभार लागला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास, सबका प्रयास' या विचारातून प्रेरणा घेत आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली समाजातील गरजू घटकांपर्यंत मदत पोहोचविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकारातून सामाजिक संस्था, भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी आणि स्थानिक ग्रामस्थांनी एकत्र येत हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी योगदान दिले.

या उपक्रमाप्रसंगी खरोशी गावच्या सरपंच रोहिणी लांघी, उपसरपंच गोरक्ष कौदरे, माजी सरपंच भोलेनाथ कौदरे, पोलीस पाटील नवनाथ कौदरे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते किसन कौदरे, राजाराम कौदरे, नेताजी लांघी, पंढरीनाथ शिर्के, नितीन कौदरे, बाळासाहेब शिर्के,



सीमा कौदरे, सुजाता कौदरे यांच्यासह गावातील ग्रामस्थ, युवक आणि महिलांची लक्षणीय उपस्थिती होती.

तसेच, मुकुल माधव फाउंडेशन व उडान फाउंडेशनच्या वतीने डॉ. अजय चंदनवाले उपस्थित होते. भारतीय जनता पार्टीचे सरचिटणीस तथा माजी नगरसेवक विकास डोळस, भाजपा युवा मोर्चाचे अध्यक्ष दिनेश यादव, मंडलाध्यक्ष शिवराज लांडगे, रामदास कुटे, प्रमोद परदेशी, भाजपा युवा मोर्चाचे पदाधिकारी ऋषिकेश भालेकर आणि प्रकाश चौधरी यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपक्रमात सहभाग घेतला. दिवाळी म्हणजे केवळ आपल्या घरात दिवे लावण्याचा सण नाही, तर अडचणीत असलेल्या कुटुंबांच्या आयुष्यातही आनंदाचा प्रकाश निर्माण करण्याची संधी आहे. याच सामाजिक जाणिवेतून राबविण्यात आलेल्या उपक्रमाने गरजू कुटुंबांना मदतीचा आधार देण्याबरोबरच समाजातील परस्पर सहकार्य आणि माणुसकीची भावना अधोरेखित केली. आर्थिक संकटात असलेल्या कुटुंबांच्या पाठीशी उभे राहणे ही केवळ सामाजिक संस्थांची जबाबदारी नसून लोकप्रतिनिधी आणि समाजातील प्रत्येक सक्षम घटकाचे कर्तव्य आहे. 'एक हात मदतीचा' या उपक्रमातून हीच भावना प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याचा प्रयत्न करण्यात आला. सणासुदीच्या काळात गरजूंच्या चेहऱ्यावर समाधान निर्माण करण्यासाठी अशा सेवाभावी उपक्रमांची आवश्यकता असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.



नागेश अडगावकर यांच्या सुरेल गायनाने आळंदीत दिवाळी पहाट रंगली

■ आळंदी देवाची (दै. संध्या)

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधी मंदिरात आयोजित दिवाळी संगीत महोत्सवात गायक नागेश अडगावकर यांच्या सुरेल गायनाने दिवाळी पहाटचा कार्यक्रम रंगला. अभंग, शास्त्रीय संगीत आणि भक्तिसंगीताच्या सुरेल आविष्कारातून त्यांनी उपस्थित रसिकांना स्वरानंदाची अनुभूती दिली.

अडगावकर यांनी 'ज्या सुखा कारणे देव वेडावला' या अभंगासह 'कोई कहियो रे प्रभु आवन की' यांसारख्या लोकप्रिय रचना सादर केल्या. त्यांच्या गायनातील सुरेलता आणि भावपूर्ण सादरीकरणाला रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली. भक्तिरस आणि शास्त्रीय संगीताच्या संगमाने मंदिर परिसर स्वरमय झाला. यावेळी हभप ॲड.जयवंत महाराज बोधले, संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे विश्वस्त योगी निरंजननाथ, चैतन्य महाराज कबीरबुवा, ह.भ.प.पुरुषोत्तम महाराज पाटील, व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, श्रीकांत लवांडे, बाळकृष्ण मोरे, ह.भ.प.उमेश महाराज बागडे, संतोषानंद शास्त्री आणि ज्ञानेश्वर मेश्राम उपस्थित होते.

थेरगावात दिवाळी फराळ स्नेह मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ पिंपरी (दै. संध्या)

दिवाळीच्या निमित्ताने स्नेहाचा, आपुलकीचा अन् माणसांच्या भेटीगाठींचा गोड सोहळा म्हणून ओळखला जाणारा 'दिवाळी फराळ स्नेहमेळावा' थेरगाव येथे शनिवारी मोठ्या उत्साहात पार पडला. शिवसेना गटनेते विश्वजित बारणे आणि नगरसेवक नीलेश बारणे यांच्या वतीने आयोजित या स्नेहमेळाव्याला शहरातील नागरिकांचा उत्स्फूर्त व अभूतपूर्व प्रतिसाद लाभला.



राजकीय, सामाजिक आणि वैयक्तिक भेदाभेदांच्या पलीकडे जाऊन माणसांना एकत्र आणणारा हा मेळावा दिवाळीचा आनंद द्विगुणित करणारा ठरला. अडीच हजाराहून अधिक नागरिकांनी कार्यक्रमाला उपस्थित राहत फराळाचा आस्वाद घेतला. शहराच्या विविध भागांतून आलेले हजारो नागरिक, विविध राजकीय पक्षांचे ज्येष्ठ नेते, आमदार, लोकप्रतिनिधी आणि विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित व्यक्तींच्या उपस्थितीने हा सोहळा गजबजून गेला होता. यादरम्यान उपस्थितांनी दिवाळीच्या शुभेच्छांची देवाणघेवाण करत मनमोकळ्या गप्पा मारल्या. या स्नेहमेळाव्याला खासदार श्रीरंग बारणे, पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त विजय सूर्यवंशी, आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, शंकर मांडेकर अमित गोरखे, उमाताई खापरे, माजी खासदार अमर साबळे, माजी आमदार बापूसाहेब पठारे, विलास लांडे, गौतम चाबुकस्वार यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची रंगत वाढवली. उपमहापौर शर्मिला बाबर, सभागृह नेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगरसेवक विठ्ठल काटे, भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, शिवसेना उपनेत्या सुलभा उबाळे, शिवसेना जिल्हा समन्वयक बाळासाहेब वाल्हेकर, शिवसेना जिल्हा महिला संघटिका शैलाताई भोंडवे, शहर संघटिका सरिताताई साने, शिवसेना शहरप्रमुख, नगरसेवक निलेश तरस, कुणाल वाव्हळ, सुरेश भोईर, संजय काटे, शेखर चिंचवडे, नगरसेविका ऐश्वर्या तरस, मनीषा पवार, योगिता बारणे, शालिनीताई गुजर आदी मान्यवर उपस्थित होते.

यशवंतच्या सभासदांना व्याजावरील हक्क सोडण्याच्या पत्रकावर सह्या घेणे म्हणजे सभासदांच्या जखमेवर मिठ चोळण्यासारखे - राजेंद्र चौधरी

■ लोणी काळभोर (दै. संध्या)

श्री चिंतामणी यशवंत सहकारी साखर कारखाना लिमिटेड थेऊर या संस्थेच्या जमीन विक्री व्यवहारा मधून जमा झालेल्या रकमेतून सभासदांची देणी, देण्यास सुरुवात झाली असुन कार्यकारी संचालक व काही संचालकांनी सभासदांना व्याजावरील हक्क सोडण्याच्या पत्रकावर सहया घेणे म्हणजे सभासदांच्या जखमेवर मिठ चोळण्यासारखे आहे . त्यावर सभासद राजेंद्र चौधरी, लोकेश कानकाटे , भरत कुंजीर, सागर गोते व सूर्यकांत काळभोर यांनी आक्षेप घेतला असुन संचालक मंडळाचे हे कृत्य मनमानी व सभासदांची आर्थिक पिळवणूक करणारे आहे.असे म्हटले आहे. तशी तक्रार शासनाकडे करण्यात आली होती. त्यामुळे श्री चिंतामणी यशवंत सहकारी साखर कारखान्याकडून ऊस बिलांच्या संदर्भात सभासदांकडून संमतीपत्र घेताना सक्ती केली जात असल्याच्या तक्रारीची गंभीर दखल प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांनी घेतली आहे. याप्रकरणी नियमांनुसार योग्य ती उचित कारवाई करून भविष्यकाळात कोणतीही तक्रार होणार नाही याची दक्षता घेण्याचे स्पष्ट निर्देश कारखान्याच्या कार्यकारी संचालकांना देण्यात आले आहेत. ऊस उत्पादक सभासदांची तब्बल ५८ कोटी ६२ लाख ८७ हजार रुपयांची थकीत देणी देण्याची प्रक्रिया सुरू झाली असतानाच धनादेश वाटपावरून नवा वाद निर्माण झाला आहे.

कारखान्याच्या जमीन विक्रीतून प्राप्त झालेल्या रकमेतून सभासदांची थकीत एफआरपी, ऊसबिले, व्याज, अनपेड बिले, ठेवी व विविध कपातींची देणी प्राधान्याने अदा करण्याचे निर्देश प्रादेशिक सहसंचालक (साखर), पुणे यांनी १ सप्टेंबर २०२६ रोजी दिले होते. एकूण ५८६२.८७ लाख रुपयांच्या थकीत देण्यांमध्ये तब्बल



२८०१.७९ लाख रुपयांच्या व्याजाचा समावेश आहे. ऊस (नियंत्रण) आदेश १९६६ मधील तरतुदीनुसार एफआरपी वेळेत अदा न केल्यास १५ टक्के वार्षिक दराने व्याज देणे बंधनकारक असल्याचेही विभागाने स्पष्ट केले आहे.

काही संचालक सभासदांना गावात किंवा स्वतःच्या कार्यालयात बोलावून धनादेश देत आहेत. मात्र, संबंधित संमतीपत्रावर सह्या केल्याशिवाय धनादेश दिले जात नसल्याचे पेठ येथील सुजित चौधरी यांनी म्हटले आहे. तर महिला सभासद मीना चौधरी यांनीसांगितले की त्यांच्या घरी सहा धनादेश घेऊन संचालक आले होते. मात्र, संमतीपत्रावर सह्या केल्याशिवाय धनादेश देणार नाही, असे सांगण्यात आले. सह्या करायच्या नसतील तर कारखान्याच्या कार्यालयातून धनादेश घेऊन जावा, असेही त्यांना सांगण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला.

या प्रकारामुळे अडचणीत आलेले काही सभासद कारखान्याचे कार्यकारी संचालक कैलास झरे यांची भेट घेण्यासाठी कार्यालयात गेले. यावेळी गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. कार्यकारी संचालक उपस्थित झाल्यावर सभासदांनी त्यांची भेट घेतली. यावेळी भरत कुंजीर या सभासदाला संमतीपत्रावर सही न घेता धनादेश देण्यात आल्याचे सांगण्यात आले.

याबाबत भरत लक्ष्मण कुंजीर व अन्य सभासदांनी ३ नोव्हेंबर रोजी केलेल्या तक्रारीची दखल घेत प्रादेशिक उपसंचालक (साखर) प्रशांत सूर्यवंशी यांनी ५ नोव्हेंबर रोजी कारखाना प्रशासनाला पत्र पाठविले. ऊसबिलावरील व्याज न घेण्याबाबत संमतीपत्र देण्यासाठी सभासदांवर कोणतीही सक्ती करू नये, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत. तसेच संबंधित कायदे, शासन निर्णय व साखर आयुक्तांच्या आदेशानुसार योग्य कार्यवाही करण्यास सांगितले आहे.

कार्यकारी संचालक कैलास झरे म्हणाले : आम्ही कोणत्याही सभासदावर सह्या करण्यासाठी दबाव टाकत नाही. सभासद स्वतःच्या इच्छेने संमतीपत्रावर सह्या करून व्याज माफ करण्यास सहकार्य करीत आहेत. परंतु सभासदांनी यावर आक्षेप घेत उलट सभासदांवरच दबाव आणला जात असल्याचे सभासद राजेंद्र चौधरी यांनी सांगितले. नायगाव येथील शेतकरी राजेंद्र चौधरी, अर्जुन चौधरी, विलास चौधरी हे दोन दिवस झाले कारखान्यावर जाऊन सुध्दा त्यांना चेक मिळाले नाहीत. शेतकऱ्यांनी घाम घालून पिकवलेल्या ऊसाच्या पैसा साठी पोलीस ठाण्यात जाणे म्हणजे काही संचालकांच्या चुकीच्या कारभारामुळे शेतकरी उध्वस्त होणे असा अर्थ होत असल्याचे भरत कुंजीर व लोकेश कानकाटे यांनी सांगितले.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

थोडक्यात पण महत्वाचे



मुलांना भारतीय संस्कृतीशी जोडण्याची गरज:डॉ. नितीन करमाळकर यांचे मत

पुणे : दैनिक संध्या

पुण्यातील कोंढवा येथील इस्कॉन मंदिरात डॉ. भूषण पटवर्धन लिखित 'काऊ फॉर चिल्ड्रन' पुस्तकाचे प्रकाशन झाले. मुलांना भारतीय संस्कृतीशी जोडण्याची गरज असल्याचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमाळकर यांनी यावेळी सांगितले. भारतीय सण-उत्सव केवळ साजरे न करता, त्यामागील उद्देश, परंपरा आणि संस्कार मुलांना समजावून सांगावेत, असे करमाळकर म्हणाले. सणांचे शास्त्रीय, वैज्ञानिक आणि सामाजिक महत्त्व मुलांना कळल्यास भारतीय संस्कृतीची मुळे त्यांच्या मनात खोलवर रुजतील, असेही त्यांनी सांगितले. पुस्तक प्रकाशनावेळी इस्कॉन मंदिराचे उपाध्यक्ष आणि महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे सदस्य संजय भोसले, मंदिराचे उपाध्यक्ष रेवतीपती प्रभू, सर्वलक्षण प्रभू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान विभागाचे हरीश नवले, जनार्दन चितोडे, भक्तिवेदांत संशोधन केंद्राचे बलभद्र कृपा प्रभू आणि केंद्राचे संचालक के. एन. धुमाळ उपस्थित होते. करमाळकर म्हणाले, बालवयात मिळालेले संस्कार मुलांच्या मनावर खोलवर ठसतात आणि त्याचा परिणाम त्यांच्या आयुष्यावर होतो. याच विचारातून डॉ. भूषण पटवर्धन यांनी मुलांना गोमातेचे महत्त्व समजावे, या उद्देशाने पुस्तक लिहिले आहे. डॉ. भूषण पटवर्धन म्हणाले, भारतीय समाजाने गाईला केवळ पशू न मानता कुटुंबाचा भाग मानले आहे. भारतीय संस्कृतीत गाईला गोमातेचा दर्जा दिला आहे. गाईचे वैज्ञानिक, सामाजिक आणि इतर महत्त्व मुलांना समजेल अशा सोप्या भाषेत पुस्तकात मांडले आहे. लहान वयात मुलांना गाईचे महत्त्व समजल्यास भारतीय संस्कृती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जाईल, असे त्यांनी सांगितले. संजय भोसले यांनी शाळांमध्ये गो-पर्यटन सुरू करण्याची सूचना केली. मुलांनी गोशाळांना भेट दिल्यास त्यांना गाईचे महत्त्व प्रत्यक्ष अनुभवता येईल, असे ते म्हणाले. मंदिरांमध्ये गोशाळा सुरू केल्यास गोमातेचे संरक्षण आणि भारतीय संस्कृतीचा प्रसार होण्यास मदत होईल, असेही त्यांनी सांगितले. जनार्दन चितोडे म्हणाले, या पुस्तकामुळे मुले भारतीय संस्कृतीशी जोडली जातील. मोबाईल, व्हॉट्सॲप आणि फेसबुकच्या काळात मुलांचे लक्ष डिजिटल माध्यमांकडे अधिक आहे. त्यामुळे भारतीय संस्कृतीकडे त्यांचे काही प्रमाणात दुर्लक्ष होत आहे.



श्रीमंत 'दगडूशेठ' गणपती मंदिराला आकाशकंदिलांची पुष्पआरास

पुणे : दैनिक संध्या

दीपावलीनिमित्त श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिराला आकाशकंदिलांची पुष्पआरास करण्यात आली आहे. फुलांच्या सजावटीमध्ये साकारलेले हे आकाशकंदिल भाविकांचे लक्ष वेधून घेत आहेत. दिपावलीनिमित्त भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी होत आहे. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळा तर्फे दीपावलीनिमित्त मंदिरात आकर्षक आरास करण्यात आली असून विविध धार्मिक कार्यक्रमांचे देखील आयोजन करण्यात आले. नरक चतुर्दशी आणि लक्ष्मीपूजनाच्या दिवशी भाविकांनी पहाटेपासून दर्शनासाठी गर्दी केली. ट्रस्टचे अध्यक्ष महेश सूर्यवंशी म्हणाले, वसुबारसेपासून सुरु झालेल्या दीपावलीच्या मंगलमय पर्वाची सांगता तुळशीविवाह सोहळ्याने संपन्न होते. त्यामुळे मंदिरात दीपोत्सव, अन्नकोट यांसह धार्मिक कार्यक्रम देखील आयोजित केले जातात. तसेच मंदिराला आकर्षक आरास देखील करण्यात येते. भाविकांसाठी स्वहस्ते अभिषेकाची सुविधाही उपलब्ध असल्याने अनेक भाविक या मंगलपर्वात श्रीं ना अभिषेक करीत नतमस्तक होतात.

शनिवारवाड्यात 38,233 पणत्या एकाच वेळी पेटल्या

पुण्याची गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद; 50 वीरमाता आणि वीरपत्नींचा सन्मान

■ पुणे (दै. संध्या)

ऐतिहासिक शनिवारवाड्याच्या साक्षीने पुणे शहराने जागतिक विक्रमाला गवसणी घातली. 'वन्दे मातरम्'च्या सार्धशताब्दी वर्षानिमित्त पुणे महानगरपालिकेच्या वतीने आयोजित दीपप्रज्वलन सोहळ्यात तब्बल 38 हजार 233 पणत्या एकाच वेळी प्रज्वलित करण्यात आल्या. या विक्रमाची गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये अधिकृत नोंद झाली. देशभक्ती, राष्ट्राभिमान आणि भारतीय सैन्यदलाप्रती कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या या सोहळ्याने शनिवारवाड्याचा परिसर दीपप्रकाशाने उजळून निघाला.

'सन्मान राष्ट्रगीताचा, अभिमान पुणेकरांचा' या संकल्पनेतून आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटन महापौर मंजुषा नागपुरे, महापालिका आयुक्त नवल किशोर राम, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि ब्रिगेडियर तरुणेश यांच्या हस्ते झाले. अभिनव विद्यालयाच्या 11 विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'वन्दे मातरम्'च्या गायनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. लष्करी बँडच्या देशभक्तिपर सुरांनी वातावरणात उत्साह निर्माण केला.



या सोहळ्यात देशासाठी सर्वोच्च बलिदान दिलेल्या जवानांच्या 50 वीरमाता आणि वीरपत्नींचा विशेष सन्मान करण्यात आला. त्यांच्या कुटुंबीयांनी केलेल्या त्यागाप्रती कृतज्ञता व्यक्त करत त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी वरिष्ठ लष्करी अधिकारी ब्रिगेडियर तरुणेश, कर्नल विकास सावळजे आणि कर्नल श्रीनिवास सातवळेकर यांचाही सन्मान करण्यात आला.

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, मंत्री माधुरी मिसाळ आणि ब्रिगेडियर तरुणेश यांनी उपस्थितांना संबोधित केले. 'वन्दे मातरम्'चा इतिहास, राष्ट्रभक्ती आणि सैन्यदलाचे देशाच्या सुरक्षेतील योगदान यावर त्यांनी प्रकाश टाकला.



कार्यक्रमातील 38 हजार 233 पणत्यांचे एकाच वेळी करण्यात आलेले प्रज्वलन हे मुख्य आकर्षण ठरले. गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे अधिकृत परीक्षक स्वप्नील डांगरीकर यांनी या उपक्रमाची प्रत्यक्ष पडताळणी केली. त्यानंतर विक्रमाची अधिकृत नोंद झाल्याचे जाहीर करण्यात आले. महापौर मंजुषा नागपुरे आणि आयुक्त नवल किशोर राम यांनी विक्रमाचे प्रमाणपत्र स्वीकारले. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रजीत नायर, ओमप्रकाश दिवटे, महापालिकेचे अधिकारी, नगरसेवक आणि नगरसेविका उपस्थित होते. उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी आभार मानले. राष्ट्रगीताच्या सामूहिक गायनाने सोहळ्याची सांगता झाली. ऐतिहासिक शनिवारवाड्यातील या उपक्रमामुळे पुण्याच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वैभवात जागतिक विक्रमाची भर पडली.

ऐन दिवाळीत पुण्यात रक्तरंजित थरार: कोथरूडमध्ये सराईत गुन्हेगाराची निर्घृण हत्या

■ पुणे (दै. संध्या)

दिवाळीच्या पूर्वसंध्येला पुण्यात एका रक्तरंजित घटनेने खळबळ उडवली आहे. शहरातील कोथरूड भागातील सुतारदरा परिसरात एका तरुणावर धारदार शस्त्राने सपासप वार करून त्याची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. प्रकाश येवले उर्फ लाल्या (वय 27) असे खून झालेल्या तरुणाचे नाव असून, तो रेकॉर्डवरील गुन्हेगार होता. काही दिवसांपूर्वी त्याचे परिसरातील एका मंडळातील तरुणांशी काही कारणावरून वाद झाले होते. याच जुन्या वादातून हा खून झाला असल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे.

शनिवारी रात्री 9 वाजेच्या सुमारास प्रकाश येवले हा सुतारदरा भागातून जात असताना तीन ते चार जणांच्या टोळक्याने त्याला अडवले. या टोळक्याने त्याच्यावर लाकडी दांडक्याने आणि लोखंडी शस्त्राने हल्ला चढवत डोक्यावर आणि पाठीवर गंभीर वार केले. या प्राणघातक हल्ल्यानंतर हल्लेखोर घटनास्थळावरून पसार झाले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या येवलेला स्थानिकांनी तातडीने खाजगी रुग्णालयात नेले, मात्र तिथे पोहोचण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता. कोथरूड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला असून, आरोपींची नावे निष्पन्न झाली आहेत आणि त्यांच्या शोधासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत.

दिवाळीच्या सणासुदीत घडलेल्या या घटनेमुळे कोथरूड आणि सुतारदरा परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने आणि कोथरूड पोलिसांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत तातडीने तपास सुरू केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज आणि प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी हल्लेखोरांची ओळख पटवली आहे. हे हल्लेखोरही सराईत गुन्हेगार असल्याचे उघड झाले असून, वर्चस्वाच्या वादातून हा खून झाल्याचा पोलिसांचा संशय आहे.

फरार असलेल्या संशयित आरोपींना लवकरात लवकर गजाआड करण्यासाठी पोलिसांनी शहरात आणि लगतच्या परिसरात विशेष शोधमोहीम हाती घेतली आहे. आरोपींच्या मार्गाचा मागोवा घेण्यासाठी तांत्रिक विश्लेषणाची मदत घेतली जात आहे. वेगवेगळ्या ठिकाणी शोध पथके पाठवण्यात आली असून, लवकरच सर्व आरोपींना अटक करण्यात यश येईल, असा विश्वास पोलीस अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

कायदा आणि सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

दिवाळीसारख्या मोठ्या सणाच्या तोंडावर पुण्यात पुन्हा एकदा कोयता गँगची दहशत आणि गुन्हेगारीच्या घटना वाढल्याने शहरातील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या वाढत्या गुन्हेगारीमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप असून, अशा प्रकारच्या हिंसक घटनांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी परिसरात गस्त वाढवावी आणि गुन्हेगारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक रहिवासी आणि व्यावसायिकांकडून केली जात आहे.

'संगीत रामदासायन'मधून समर्थ रामदास स्वामींचा जीवनपट उलगडला

स्वरप्रभा फाऊंडेशनचा कार्यक्रम पत्रकार भवनात; पराग पांडव यांचे गायन आणि निरूपण

■ पुणे (दै. संध्या)

पुण्यात स्वरप्रभा फाऊंडेशनतर्फे 'संगीत रामदासायन' हा समर्थ रामदास स्वामी यांच्या जीवनावरील काव्यांचा कार्यक्रम झाला. पत्रकार भवनात झालेल्या या सादरीकरणातून त्यांच्या जीवनातील विविध प्रसंग उलगडले.

प्रतिभा गारटकर यांनी लिहिलेल्या काव्यांना पराग पांडव यांनी संगीत दिले आणि गायन-निरूपण केले. रेणुका पांडे-कुरूलकर यांनी सहगायन केले. समीर बंकापुरे यांनी तबला, पवन अवचरे यांनी पखवाज, अदिती गराडे यांनी संवादिनी, सत्यजित सराफ यांनी की-बोर्ड, नरेंद्र काळे यांनी तालवाद्य आणि माधुरी सुतार यांनी कोरसची साथ दिली.

'गोदाकाठी जांब गाव ते ठोसर कुलवंत', 'राणूपुत्र जन्मला गं', 'ऐक ऐक सखये बाई', 'राणूबाईचा पुत्र सखे गं', 'शांत जाहले मन हे दादा हरिदर्शनाने', 'भेट द्याहो रामराया', 'तव भेटीचा ध्यास जीवाला', 'विजयश्री माळ गळा' आणि 'तुम्ही थोर ज्ञानी, तुम्ही हो समर्थ' या रचना सादर झाल्या.

कार्यक्रमाची सुरुवात 'जय जय रघुवीर समर्थ'च्या जयघोषाने आणि 'श्रीराम जयराम जय जय राम'च्या गजराने झाली. श्रीरामांच्या दृष्टांतातून सूर्याजीपंतांना मिळालेला त्रयोदशाक्षरी मंत्र आणि त्याच्या जपामुळे त्यांना दोन पुत्र झाल्याचा प्रसंग सांगण्यात आला. सूर्यदेवांच्या प्रसादाप्रमाणे वज्रअंश घेऊन नारायणाचा जन्म झाला, त्याचे बालपण आणि आई राणूबाईंच्या शिकवणुकीमुळे त्याच्या स्वभावात झालेले बदलही मांडले.



गुरुमंत्रासाठी मारुतीरायाला शरण गेलेला नारायण आणि त्यांच्या दर्शनानंतर शांत झालेला नारायण यांचे प्रसंगही सादर झाले. आईच्या आग्रहामुळे लग्नासाठी उभा राहिलेला नारायण, 'शुभमंगल सावधान' ऐकताच बोहल्यावरून पळून जाणे, श्रीरामाच्या भेटीच्या ओढीने नाशिकजवळील टाकळी येथे १२ वर्षे केलेली तपश्चर्या आणि १३ कोटी रामनामाचा जप यांचे निरूपण गीतांतून झाले.

समाजाचे निरीक्षण करत पायी भ्रमंती, हिंदवी स्वराज्याचे स्वप्न आणि बलोपासनेचे महत्त्व ओळखून मारुतीरायांची ११ मंदिरे स्थापन करण्याचे प्रसंग सांगण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांची भेट आणि त्यांना केलेले मार्गदर्शनही सादरीकरणात गुंफले होते.

समाज एकत्र आल्याशिवाय सुधारणा आणि हिंदुत्वाचा प्रचार होणार नाही, हा विचारही कार्यक्रमात मांडला. हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेने समर्थ रामदास स्वामींचे स्वप्न पूर्ण झाल्याचे वर्णन करत 'राज्य मराठी आनंद भुवनी' या भैरवीतील रचनेने कार्यक्रमाची सांगता झाली. सादरीकरण आणि रचनांना रसिकांनी टाळ्यांनी दाद दिली.

शिक्षण आयुक्तालयासमोर राष्ट्रीय रोस्टर राईट्स जस्टिस असो.च्या फणसे यांचे उपोषण सुरू

शिक्षक भरतीतील अनियमितता व बिंदुनामावलीतील कथित घोळाच्या निष्पक्ष SIT चौकशीची मागणी; विविध शिक्षक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांचा पाठिंबा

■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्रातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी भरतीतील कथित अनियमितता, आरक्षण बिंदुनामावलीतील फेरफार तसेच नियुक्त्या, वैयक्तिक मान्यता, बदल्या, सेवासातत्य आणि शालार्थ नोंदींमधील तक्रारींची निष्पक्ष व सखोल चौकशी विशेष चौकशी पथकामार्फत (SIT) करण्यात यावी, या मागणीसाठी राष्ट्रीय रोस्टर राईट्स जस्टिस असोसिएशन, सातारा या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदिप निवृत्ती फणसे यांनी शिक्षण आयुक्तालय, पुणे येथे दि. ७ नोव्हेंबर २०२६ पासून उपोषण सुरू केले आहे. हे उपोषण दररोज सकाळी १० ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे.

यापूर्वी दि. २ नोव्हेंबर ते ६ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत फणसे यांनी शिक्षण आयुक्तालयासमोर शांततामय मार्गाने सत्याग्रह ठिय्या आंदोलन केले. मात्र, या आंदोलनानंतरही तक्रारींच्या प्रमुख मुद्द्यांवर ठोस निर्णय व चौकशीची निश्चित कालमर्यादा मिळाली नसल्याने त्यांनी ७ नोव्हेंबरपासून उपोषण सुरू करण्याचा निर्णय घेतला.या आंदोलनाच्या पहिल्याच दिवशी पाठिंबा देण्यासाठी शिक्षक संघटनेचे राज्य समन्वयक प्रकाश घोळवे (पुणे), सचिन हंगे (सांगली), ॲड. राजकुमार सरतापे (सोलापूर) तसेच मुंबई शिक्षक लोकशाही आघाडी (टी.डी.एफ.) चे अध्यक्ष जनार्दन जंगले हे दिवसभर आंदोलनस्थळी उपस्थित होते. त्यांनी आंदोलनात सहभागी होऊन फणसे यांच्या मागण्यांना पाठिंबा दर्शविला.

फणसे यांनी सन २००२ पासून राज्यातील आरक्षण रोस्टर व बिंदू नामावली च्या प्रश्नांवर पाठपुरावा सुरू केला आहे. तसेच सन २०१२ ते २०२६ या कालावधीतील कथित अपात्र शिक्षक भरती व भरती प्रक्रियेतील अनियमिततां बाबत विविध शासकीय कार्यालयांकडे तक्रारी आणि कागदपत्रे सादर केली आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार, या प्रकरणासंदर्भात मोठ्या प्रमाणावर पुरावे संबंधित यंत्रणांकडे सादर करण्यात आले आहेत.

शासनाने दि. ७ ऑगस्ट २०२५ रोजी विशेष चौकशी पथक (SIT) स्थापन केले. या प्रकरणी फणसे यांनी दि. १५ सप्टेंबर २०२५, १० नोव्हेंबर २०२५ आणि १३ नोव्हेंबर २०२५ रोजी तक्रारी व स्वतंत्र पोलीस सहभागाबाबत निवेदने सादर केली होती. त्यानंतर ही चौकशीच्या प्रत्यक्ष कार्यवाही बाबत पुरेशी स्पष्टता मिळाली नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे.अलीकडे दि. २९ ऑक्टोबर २०२६ रोजी सादर केलेल्या तक्रार निवेदनाच्या अनुषंगाने SIT सदस्य सचिव हारुन आतार यांनी दि. ३ नोव्हेंबर २०२६ रोजी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभागाकडे चौकशीबाबत पत्र पाठविले. त्यानुसार शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी दि. ५ नोव्हेंबर २०२६ रोजी संबंधित सहसंचालक डॉ. श्रीराम पानझडे यांना तक्रारीची सखोल चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

मात्र, SIT चौकशीच्या कालमर्यादा शेवटचा दिवस दि. ७ नोव्हेंबर २०२६ असल्याचे फणसे यांचे म्हणणे असून, चौकशीच्या अंतिम टप्प्यात माध्यमिक विभागाकडे चौकशी सोपविण्यात आल्याने त्याबाबत त्यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. चौकशीची प्रत्यक्ष व्याप्ती, आतापर्यंत तपासलेले अभिलेख आणि सादर केलेल्या पुराव्यांची पडताळणी याबाबत स्पष्ट माहिती मिळणे आवश्यक असल्याची त्यांची भूमिका आहे.फणसे यांनी दि. ६ नोव्हेंबर २०२६ रोजी सत्याग्रह ठिय्या आंदोलन थांबवून दुसऱ्या दिवसापासून उपोषण सुरू करण्याबाबत प्रशासनाला निवेदन दिले होते. त्यानुसार दि. ७ नोव्हेंबरपासून त्यांनी उपोषण सुरू केले आहे.



सन २०१२ पासूनच्या शिक्षक भरती प्रक्रियेतील जाहिरात व निवड यादीपासून नियुक्ती आदेश, वैयक्तिक मान्यता, आरक्षण बिंदुनामावली, सेवासातत्य, विनाअनुदानित शाळा किंवा तुकड्यांवरून अनुदानित शाळा किंवा तुकड्यांवर झालेल्या बदल्या, शालार्थ आयडी आणि वेतन अनुदानापर्यंत संपूर्ण प्रक्रियेची मूळ अभिलेखांच्या आधारे तपासणी करण्यात यावी, अशी त्यांची प्रमुख मागणी आहे.तसेच संबंधित संस्थांकडील मूळ कागदपत्रे मागवून त्यांची पडताळणी करावी, चौकशीमध्ये स्वतंत्र पोलीस अधिकाऱ्यांचा सहभाग असावा, तक्रारदाराला आपली बाजू मांडण्याची संधी द्यावी आणि पुराव्यांनुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करून कायदेशीर कार्यवाही करावी, अशीही मागणी त्यांनी केली आहे. प्रशासनाने केवळ चौकशी सुरू असल्याचे सांगण्याऐवजी तक्रारींवर झालेली प्रत्यक्ष कार्यवाही, तपासणीची व्याप्ती, पुराव्यांची पडताळणी आणि अंतिम अहवाल सादर करण्याची निश्चित मुदत लेखी स्वरूपात जाहीर करावी, अशी भूमिका फणसे यांनी व्यक्त केली आहे.या आंदोलनाचा उद्देश कोणत्याही व्यक्तीविरुद्ध पूर्वग्रह ठेवणे नसून, मूळ शासकीय अभिलेखांची निष्पक्ष तपासणी करून सत्य परिस्थिती समोर आणणे आणि दोषी आढळणाऱ्यांवर कायद्यानुसार कार्यवाही होणे हा असल्याचे फणसे यांनी स्पष्ट केले.

थोडक्यात पण महत्वाचे



उरण नगर परिषद मधील कामगारांच्या न्याय हक्कासाठी काम बंद आंदोलन

उरण : दैनिक संध्या

उरण नगरपरिषदेमध्ये गेली २० वर्षे पी. के. ठाकूर या ठेकेदाराकडे संपूर्ण उरण नगरपरिषद हद्दीतील, उरण शहरासह पाणीपुरवठा देखभाल-दुरुस्तीचे काम करणारे ४ कामगार आणि संपूर्ण सार्वजनिक शौचालय स्वच्छता करणारे ६ कर्मचारी कार्यरत आहेत. या १० कष्टकरी कामगारांना गेल्या २ वर्षांचा बोनस आणि गेल्या २ महिन्यांचा पगार अद्याप दिलेला नाही. पाणीपुरवठा व्यवस्थित व सुरळीत राहावा, तसेच संपूर्ण उरण शहर आजूबाजूच्या ग्रामपंचायती तसेच संपूर्ण तालुक्यातून बाजारहाटासाठी उरण बाजारपेठेत येणाऱ्या जनतेला सार्वजनिक शौचालयांची सोय मिळावी, यासाठी हे कामगार रात्रंदिवस मेहनत करतात. मात्र दिवाळीसारख्या सणाला देखील त्यांना त्यांचा मेहनताना मिळालेला नाही. त्यांच्या श्रमावर ठेकेदार लाखो रुपये कमवत आहे, असा कामगारांचा आरोप आहे. पी. के. ठाकूर यांची आज जी काही मालमत्ता आहे, ती याच उरण नगरपरिषदेच्या ठेक्यामुळे, म्हणजेच याच कामगारांच्या श्रमावर उभी राहिली आहे, असेही कामगारांचे म्हणणे आहे. पी. के. ठाकूर हे हयात असताना असा प्रश्न कधी निर्माण झाला नव्हता. मात्र गेल्या दोन वर्षांपासून त्यांचे पुत्र अनिरुद्ध ठाकूर यांच्याकडे जबाबदारी आल्यानंतर ही परिस्थिती निर्माण झाली आहे, असे कामगारांनी सांगितले. या संदर्भात कामगारांनी म्युनिसिपल एम्प्लॉइज युनियनचे अध्यक्ष ॲड. सुरेश ठाकूर, सरचिटणीस अनिल जाधव, कार्याध्यक्ष संतोष पवार यांच्याकडे निवेदन दिले. तसेच नगराध्यक्षा भावनाताई घाणेकर आणि मुख्याधिकारी समीर जाधव यांनाही निवेदन देण्यात आले. कायद्यानुसार ठेकेदाराच्या कामगारांचे मुख्य मालक म्हणून मुख्याधिकारी समीर जाधव, उरण नगरपरिषद यांनी आपली जबाबदारी स्वीकारली नाही, केवळ औपचारिकता करण्याचे काम मुख्याधिकारी करत आहेत परंतू प्रत्यक्षात प्रश्न सुटला पाहिजे असे मुख्याधिकारी श्री समिर जाधव यांना वाटत नाही असा युनियनचा आरोप आहे.

लोककलावंत सांस्कृतिक मंच ऐरोली नवी मुंबई संस्थेचा भव्य मेळावा संपन्न

मुंबई : दैनिक संध्या

दि ४/११/२६ रोजी लोककलावंत सांस्कृतिक मंच ऐरोली नवी मुबंई या संस्थेच्या वतीने लोककलावंतांचा भव्य मेळावा विष्णुदास भावे नाट्यगृह वाशी नवी मुंबई या ऐतिहासिक वास्तूत अत्यंत भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आला होता. विविध लोककलाच्या सादरीकरणातून परिवर्तनाचा मानवी मूल्य जोपासणारा विचार सहजतेने सामान्य माणसापर्यंत पोहोचवता येतो मानवनिर्मिती पासून संगीत लोककला मानवाच्या प्रगती बरोबरच प्रगतशील होत गेल्या. संगीत हे निसर्गात व मानव समूहात दृश्य अदृश्य स्वरूपात सुगंधाप्रमाणे नियमित दरवळत असते.संगीतावर व लोककलांवर नितांत प्रेम करणाऱ्या आणि कला संवर्धनासाठी सतत कृतीशील असलेल्या लोककलावंत सांस्कृतिक मंच या संस्थेने कलावंत मेळावा आयोजित केला होता. या कार्यक्रमात महाराष्ट्र भरातून अनेक गझलकार, कवी, गायक, संगीतकार, साहित्यिक अशा अनेक दिग्गज कलावंतांनी आपली उपस्थिती दर्शविली होती. त्याप्रसंगी कवी गायक रुपेश साखरे यांना 'राज्यस्तरीय कलारत्न' या मानाच्या पुरस्काराने गौरविण्यात आले. हा पुरस्कार महाराष्ट्राचे लोकप्रिय गीतकार,संगीतकार,कवी,जेष्ठ साहित्यक "विसरू नको रे आई बापाला," या अजरामर गीताचे गायक, विष्णू शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या पुरस्कारासाठी कवी रुपेश साखरे यांची निवड करण्यात आली. राज्यस्तरीय कलारत्न पुरस्कार मिळाल्या बद्दल आदरणीय गायक विठ्ठल राऊत,गायक अभिमान गायकवाड, गायक अजय अटकाळे, गायक विष्णू (अण्णा) शिंदे सर गायिका सारिका सावंत यांनी रुपेश साखरे यांचे हार्दिक अभिनंदन केले.





चाकण शॉपिंग फेस्टिवल उपक्रम प्रेरणादायी, शुभांगी आगरकर यांचे प्रतिपादन

चाकण : दैनिक संध्या

स्वामिनी महिला बहुउद्देशीय संस्था, यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला 'चाकण शॉपिंग फेस्टिव्हल हा उपक्रम सर्वांसाठी प्रेरणादायी व कौतुकास्पद असल्याचे शुभांगी आगरकर यांनी सांगितले. महिला उद्योजिकांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. महिलांमध्ये अनेक कला, कौशल्ये आणि उद्योजकतेची क्षमता असते. मात्र, अनेकदा आर्थिक मर्यादा आणि योग्य बाजारपेठेचा अभाव यामुळे त्यांच्या कौशल्यांना अपेक्षित संधी मिळत नाही. हीच बाब लक्षात घेऊन स्वामिनी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने शुभांगी आगरकर यांनी महिलांना व्यवसायासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे. मेळाव्याचे आयोजन संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा शुभांगी आगरकर यांच्यासह सरिता शेवकरी, सुप्रिया बनकर, प्रियंका शेवकरी, निलोफर शेख, सुनिता सोरटे, धनश्री परदेशी, अपर्णा कानडे, सुनिता कांडगे आदींनी केले होते. नगरसेविका ॲड. वर्षा शेवकरी यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. चाकण येथील या मेळाव्यात सहभागी झालेल्या नागरिकांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे खरेदीच्या आनंदासोबतच आरोग्याची काळजी घेण्याची संधीही नागरिकांना मिळाली. स्वामिनी महिला बहुउद्देशीय संस्था केवळ चाकणपुरती मर्यादित न राहता विविध ठिकाणी महिलांच्या सक्षमीकरणासाठी, रोजगारनिर्मितीसाठी आणि महिलांना एकत्र आणून त्यांच्यातील कौशल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. प्रियंका शेवकरी यांनी स्वागत केले. सुनिता कांडगे यांनी सर्वांचे आभार मानले.

ऊसतोड कामगारांच्या हक्कांसाठी सातत्यपूर्ण वाटचाल : डॉ. नीलम गोऱ्हे

मुंबई (दै. संध्या)



राज्याच्या विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी ऊसतोड कामगारांच्या हक्कांसाठी आणि कल्याणासाठी सातत्याने पुढाकार घेतला आहे. कायदेशीर चौकटीची निर्मिती, आरोग्यविषयक गंभीर समस्यांचे निराकरण आणि महिला कामगारांच्या सक्षमीकरणापर्यंत त्यांच्या कार्याची व्याप्ती पसरलेली आहे.

ऊसतोड कामगारांच्या आरोग्य, आर्थिक आणि सामाजिक स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी डॉ. गोऱ्हे यांनी सर्वसमावेशक कायदा तयार करण्यावर भर दिला आहे. या कायद्याचा मसुदा संकेतस्थळावर प्रसिद्ध करून नागरिकांकडून सूचना व प्रतिक्रिया मागवण्याचे निर्देश त्यांनी दिले, जेणेकरून कायदा अधिक लोकाभिमुख होईल. योजनांची केवळ घोषणा न करता त्यांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी आणि कामगारांना आवश्यक साहित्य वेळेत मिळावे यासाठीही त्यांनी सूचना दिल्या.

ऊसतोड कामगारांच्या आरोग्याच्या गंभीर समस्या, विशेषतः महिलांच्या आरोग्याकडे डॉ. गोऱ्हे यांनी गांभीर्याने लक्ष दिले. बीड जिल्ह्यातील महिला कामगारांच्या गर्भाशय काढण्याच्या शस्त्रक्रियांच्या प्रकरणाची त्यांनी गंभीर दखल घेतली. या समस्येवर मात करण्यासाठी सामाजिक न्याय मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र टास्क फोर्स स्थापन करण्याचे आदेश त्यांनी दिले. कामगारांना गमबूट, इलेक्ट्रिक कोयता, ग्लोव्हज आणि महिलांसाठी सॅनिटरी नॅपकिन्स डीबीटी (DBT) द्वारे तात्काळ उपलब्ध करून देण्याचे निर्देशही त्यांनी दिले. तसेच, कामाच्या ठिकाणी फिरता दवाखाना आणि फिरत्या स्वच्छतागृहांची संख्या वाढवण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

ऊसतोड महिला कामगारांना प्रसूतीसाठी सहा महिन्यांची सवेतन रजा मिळावी यासाठी डॉ. गोऱ्हे यांनी प्रयत्न सुरू केले आहेत. या उद्देशाने एक १५ सदस्यीय राज्यस्तरीय समिती स्थापन करण्यात येणार असून तिच्या अध्यक्षपदी त्या असतील. कामगारांच्या कुटुंबातील महिला व मुलींच्या आरोग्याची तपासणी होईल यासाठी विशेष शिबिरे घेण्याचे निर्देश त्यांनी दिले. ऊसतोड कामगारांची संख्या मोठी असूनही नोंदणी कमी असल्याचे डॉ. गोऱ्हे यांच्या निदर्शनास आले. त्यामुळे कामगारांची नोंदणी वाढवण्यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश त्यांनी दिले, जेणेकरून त्यांना सरकारी योजनांचा लाभ मिळू शकेल. कामगारांना कल्याणकारी योजनांसाठी नोंदणी करता यावी यासाठी विशेष शिबिरे आयोजित करण्याचे आवाहन त्यांनी केले. जिल्हास्तरावर सर्व संबंधित विभागांच्या संयुक्त आढावा बैठका घेऊन कामगारांच्या आरोग्य, सुरक्षा, शिक्षण आणि मूलभूत सुविधांचा आढावा घेण्याचे निर्देशही त्यांच्या शिफारशींनुसार देण्यात आले.

थोडक्यात, डॉ. नीलम गोऱ्हे यांचे कार्य कायदेशीर सुधारणा, आरोग्य सेवा, महिला सक्षमीकरण आणि योजनांच्या प्रभावी अंमलबजावणी या सर्व बाजूंना स्पर्श करणारे आहे.

दहावी, बारावी लेखी परीक्षांच्या तारखा जाहीर

पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे अंतिम वेळापत्रक जाहीर केले आहे. बारावीची लेखी परीक्षा ८ फेब्रुवारी ते १८ मार्च २०२७, तर दहावीची लेखी परीक्षा १५ फेब्रुवारी ते १५ मार्च २०२७ या कालावधीत होणार आहे.

यासंदर्भातील परिपत्रक मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी प्रसिद्ध केले आहे. राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत या परीक्षा घेण्यात येणार आहेत.

बारावीच्या प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी आणि अंतर्गत मूल्यमापनाच्या परीक्षा २० जानेवारी ते ६ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत होतील. तर दहावीच्या प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी आणि अंतर्गत मूल्यमापनासाठी २८ जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२७ हा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. परीक्षांचे वेळापत्रक मंडळाच्या वेबसाइटवर शुक्रवारीच दिले आहे.

अरुण लाल यांना तन्वीर नाट्यधर्मी पुरस्कार जाहीर

पुणे (दै. संध्या)



केरळमधील रंगभूमीवर अभिनेता, दिग्दर्शक, नृत्यदिग्दर्शक आणि नाट्यप्रशिक्षक म्हणून २५ वर्षे काम करणारे अरुण लाल यांना यंदाचा तन्वीर नाट्यधर्मी पुरस्कार जाहीर झाला आहे. ते 'लिटल अर्थ स्कूल ऑफ थिएटर'चे कलात्मक संचालक आहेत.

पुण्यातील रुपवेध प्रतिष्ठान आणि महाराष्ट्र कल्चरल सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. पुरस्कारात मानचिन्ह आणि ७५ हजार रुपये रोख दिले जातात. सोमवार, १६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता टिळक रस्त्यावरील हिराबाग चौकातील श्रीराम लागू रंग-अवकाश येथे समारंभ होईल. राष्ट्रीय नाट्य विद्यालयाच्या सिक्कीम केंद्राचे संचालक आणि संगीत नाटक अकादमी पुरस्काराचे मानकरी सौती चक्रवर्ती यांच्या हस्ते अरुण लाल यांना पुरस्कार दिला जाईल.

समारंभानंतर अरुण लाल दिग्दर्शित 'मट्टीया' नाटकाचा प्रयोग होणार आहे. तन्वीर नाट्यधर्मी पुरस्काराचे हे १९ वे वर्ष आहे. रंगभूमीतील योगदानासाठी कलाकारांना हा पुरस्कार दिला जातो.

२००४ मध्ये तन्वीर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांचे आई-वडील दीपा आणि डॉ. श्रीराम लागू यांनी पुरस्कार सुरू केला. याआधी प्रसाद वनारसे, लकी गुप्ता, गणेश मंदार्थी, रुतुपर्ण बिस्वास आणि दुष्यंत गुणशेखर यांना हा पुरस्कार मिळाला आहे.

अरुण लाल यांनी ३० हून अधिक नाटकांमध्ये अभिनय केला असून, विविध भाषा आणि शैलींतील ३५ हून अधिक नाटकांचे दिग्दर्शन केले आहे. यात बालनाट्यांचाही समावेश आहे. पारंपरिक सादरीकरण, शारीरिक अभिनय आणि केरळची कलरिपयट्टू युद्धकला यांचा त्यांच्या नाट्यशैलीवर प्रभाव आहे.

२०१५ मध्ये त्यांना केरळ संगीत नाटक अकादमीचा सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा राज्य पुरस्कार मिळाला. २०१९ मध्ये META चा सर्वोत्कृष्ट नृत्यदिग्दर्शक पुरस्कार आणि २०२२ मध्ये 'चविट्टू' चित्रपटासाठी ५२ व्या केरळ राज्य चित्रपट पुरस्कारांमधील सर्वोत्कृष्ट नृत्यदिग्दर्शनाचा पुरस्कार मिळाला. त्यांना अवनावन कदंब पुरस्कारानेही गौरवण्यात आले आहे.

'अस्मानी संकटात राज्य सरकार भक्कमपणे तुमच्या पाठीशी' - मुख्यमंत्री फडणवीस

लोहारी सावंगा (दै. संध्या)



राज्यात दुष्काळाच्या स्वरूपात अस्मानी संकट उभे ठाकले असताना राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे. आर्थिक मदतीसह विविध योजनांचा आधार दुष्काळग्रस्तांना दिला जात आहे. आगामी काळातही अनेक योजना लागू करण्यात येणार असून या अस्मानी संकटाचा आम्हा सर्वांना एकजुटीने सामना करावा लागेल, असे आश्वासक उद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूर जिल्ह्यातील लोहारी सावंगा गावात गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने आयोजित प्रार्थना सभेनंतर उपस्थित ग्रामस्थांपुढे बोलताना काढले.

लोहारी सावंगा गावातील ग्रामपंचायतीच्या आवारातील सभामंडपात या प्रार्थना सभेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्यासमवेत नागपूरचे पालकमंत्री तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार सर्वश्री चरणसिंह ठाकूर, आशिष देशमुख, डॉ. राजीव पोतदार, माजी आमदार सुधाकर कोहळे यांच्यासह जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

ग्रामस्थांशी संवाद साधताना मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, हे वर्ष आव्हानांचे आहे. पावसाने शेवटपर्यंत दडी दिली. त्यामुळे पिके करपली व शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. राज्यात काही ठिकाणी चाऱ्याचा आणि पिण्याच्या पाण्याचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या कठीण प्रसंगी राज्य सरकार अतिशय भक्कमपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहिलेले आहे. मध्यंतरी कर्जमाफीचा मोठा निर्णय घेऊन सरकारने शेतकऱ्यांना पुन्हा स्वतःच्या पायावर उभे केले. लाखो शेतकऱ्यांना या कर्जमाफी योजनेचा लाभ देण्यात आला. मात्र दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांपुढे पुन्हा एकदा संकट उभे ठाकले आहे. त्यासाठी आता राज्य सरकारने शेतकऱ्यांना थेट मदतीचा हात दिला असल्याचे ते म्हणाले. शेतकऱ्यांना दिवाळी साजरी करता यावी यासाठी सरकारने सुमारे दीड कोटी शेतकऱ्यांच्या खात्यात पाच हजारांची रक्कम जमा केली आहे. ही रक्कम जमा करण्याची प्रक्रिया सुरूच आहे. शेतकऱ्यांचे विज बिल माफ करण्यात आले आहे. शिवाय वीज बिलाची थकबाकी देखील माफ करण्यात आली आहे. याशिवाय, ग्रामीण जनतेला दिलासा देण्यासाठी विविध योजना लागू करण्यात आल्या आहेत. आगामी काळातही काही योजना लागू करण्यात येणार आहेत. जलसंधारणाची कामे व्यापक प्रमाणात हाती घेतली जाणार असल्याचे ते म्हणाले.

लोकांच्या आरोग्यासह विविध प्रश्न दूर करण्याचे प्रयत्न केले जाणार आहेत. शेतकरी संकटात असताना दिवाळीचे हे पर्व त्याला धीर देण्यात घालवावे, या उद्देशाने आम्ही गावात आलो आहोत, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

'दिवाळी पहाटेचे अभ्यंगस्नान' आणि अंगाला चिकटलेले उटणे काढताना झालेली ऐतिहासिक वाताहत!



जगातील सर्व आंतरराष्ट्रीय स्पा (Spa) आणि ब्युटी पार्लर्सनी त्वचेच्या उपचारांवर भलेमोठे रिसर्च पेपर प्रसिद्ध केले असतील; परंतु नरक चतुर्दशीच्या दिवशी पहाटे साडेचार वाजता पुण्याच्या सदाशिव पेठेतील मध्यमवर्गीय घराच्या बाथरूममध्ये, डोक्यावर अर्धा लिटर तिळाचे तेल ओतून आणि अंगाला चंदनाचे सुगंधी उटणे थापून, पितळी हंड्यातील खळखळ उकळत्या पाण्याने मराठी नवऱ्याचे जे काही सालपटे सोलून काढले जाते, त्यावर प्रत्यक्ष जागतिक आरोग्य संघटनेने थरकाप भरून डोळे मिटले असते!.

रविवारी पहाटे बरोबर सव्वाचार वाजता माझ्या अंगावरील पांघरूण अशा काही क्रूर वेगाने खेचले गेले, जणू काही साक्षात नरकासुराचे सैन्य माझ्या बेडरूममध्ये घुसले आहे! श्रीमंत धर्मपत्नी हातात वाटी आणि तेलाचा दिवा घेऊन उभ्या होत्या "उठा! आज नरक चतुर्दशी आहे. सूर्योदयापूर्वी अभ्यंगस्नान झाले नाही, तर वर्षभर नरकात जागा मिळते म्हणे!"

'नरकात जागा मिळणे' यापेक्षा पहाटे चार वाजता गारठ्यात उघड्या अंगाने बसणे हाच साक्षात नरकाचा प्रत्यक्ष अनुभव होता! मला दिवाणखान्यात एका पाटावर बसवण्यात आले. धर्मपत्नीने हाताला थोडे उटणे आणि तीळ तेल घेतले, आणि माझ्या डोक्यावर असा काही जोरदार हात चालवला, जणू काही त्या बंद पडलेल्या स्कूटरचे इंजिन किक मारून चालू करत आहेत.

त्यानंतर डोळ्यांत दोन थेंब तेल गेले. डोळ्यांची आग सुरू झाली, आणि मी आंधळ्यासारखा चाचपडत बाथरूमकडे पळालो. बाथरूममध्ये बबन्या आधीच हजर होता. त्याच्या हातात एक लहान हिरवे कडू 'कारिट' होते. "बाबा, आधी पायाच्या अंगठ्याने हे कारिट फोडा, मग आंघोळ!" बबन्याने फर्मान सोडले.

मी थरथरत्या पायाने त्या निसरड्या कारिटावर पाय ठेवला. कारिट फुटण्याऐवजी साबणाच्या वडीसारखे सटकले आणि थेट दिवाणखान्यात सोफ्याच्या खाली जाऊन लपले! त्या कडू कारिटाला बाहेर काढण्यासाठी मला पहाटे साडेचार वाजता पांढरा सदरा न घालता जमिनीवर पालथे पडून झाडूने शोधाशोध करावी लागली! कारिट अखेर एका चपलेच्या फटक्याने फोडले; पण त्या नादात माझ्या पायाच्या अंगठ्याला जो काही मार बसला, त्याने मला साक्षात यमराजाचे वाहन रेडा प्रत्यक्ष दिसल्याचा भास झाला.

बाथरूममध्ये शिरल्यावर उटण्याचा लेप अंगावर सुकला होता. अंगाला हात लावला तर त्वचा अशी खरखरीत झाली होती, जणू काही सिमेंटचे गिलावा केलेले घर! गीझरचे पाणी अंगावर घेताच उटण्याचा चिखल होऊन संपूर्ण पायाभोवती साचला. साबण लावला तरी ते चंदनाचे उटणे त्वचेला असे काही चिकटून बसले होते, जणू काही ते माझ्या जन्मपत्रिकेतील मंगळच आहे.

अर्ध्या तासाच्या अथांग परिश्रमानंतर, त्वचेचा अर्धा थर बाथरुमच्या फरशीवर सांडून, डोळे चोळत मी नवीन इस्त्रीचा कडक कुर्ता घालून बाहेर आलो. दिवाणखान्यात दिवाळी पहाटेची भूपती लागली होती. धर्मपत्नीने हातात पोह्यांची आणि चकलीची डिश दिली.

पहिला चकलीचा घास तोंडात टाकताना आणि डोक्यावरील तेलाचा वास नाकात भरताना मला साक्षात्कार झाला की, नरकासुराला मारणे सोपे गेले असेल; पण दिवाळी पहाटेच्या उटण्याचा चिखल धुवून काढणे हा मध्यमवर्गीय माणसाने स्वतःच्या अंगावर घेतलेला सर्वात मोठा वार्षिक पराक्रम असतो. एकंदरीत काय, तर अंग चुरचुरले तरी दिवाळी पहाटेचा गोडवा ओसरू देऊ नका. फराळावर ताव मारा, नवीन कपडे मिरवा आणि आजचा रविवार अगदी खळखळून हसत पार पाडा.

थोडक्यात पण महत्वाचे



जिल्हास्तरीय जिम्नॅस्टिक ॲक्रोबॅटिक स्पर्धेत एस. बी. पाटील पब्लिक स्कूलचे यश

पिंपरी: दैनिक संध्या

जिल्हास्तर शालेय जिम्नॅस्टिक ॲक्रोबॅटिक स्पर्धेमध्ये १९ वर्षा खालील गटात एस. बी. पाटील पब्लिक स्कूल च्या विद्यार्थ्यांनी विविध प्रकारात उल्लेखनीय यश मिळवले. निगडी येथील इलाईट जिम्नॅस्टिक सेंटर येथे झालेल्या या स्पर्धेत मुलींमध्ये कृष्णल खंडागळे ६ वी व सावनी बडवे ७ वी यांनी तसेच मिश्र जोडी मध्ये ओम पाटील १० वी व ओवी निकम ९ वी यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. तसेच मुलांच्या गटात विश्वतेज डेरे ७ वी आयुष मगर ६ वी आणि वेदांत देशपांडे ९ वी अक्षत वारके ९ वी यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. त्याचबरोबर रुद्र जंगीरवाड ९ वी अमित कोडगोनोरा ९ वी यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी स्पर्धेत विजेत्या झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. मुख्याध्यापक डॉ. बिंदु सैनी, उपमुख्याध्यापक पद्मावती बंडा, क्रीडा शिक्षक धनाजी पाटील यांनी मार्गदर्शन केले.

प्रश्न आधी सोडवा, मगच ठोकळवाडीचे पाणी पिंपरी-चिंचवडकडे वळवा!

वडगाव मावळ : दैनिक संध्या

ठोकळवाडी धरणासाठी जमिनी दिल्या, घरे गमावली, अनेक कुटुंबांचे स्थलांतर झाले असून, आजही धरणग्रस्तांचे पुनर्वसन, मूलभूत सुविधा आणि विविध प्रश्न प्रलंबित आहेत. त्यामुळे हे प्रश्न सोडविल्याशिवाय धरणातील पाणी पिंपरी-चिंचवड शहराला देण्याचा निर्णय घेऊ नये, अशी ठाम भूमिका आंदर मावळातील ग्रामस्थांनी पत्रकार परिषदेत घेतली. पत्रकार परिषदेस जिल्हा परिषदेचे सदस्य अनंता पावशे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजेश खांडभोर, नारायण ठाकर, नामदेव शेलार, शोभीनाथ भोईर, मारुती खांडभोर, निवृत्ती ठाकर, काळूराम वाडेकर, बबन ओव्हाळ, बाळासाहेब घाडगे, रामदास आलम, सोपान खांडभोर, बजरंग आलम, लहू वाडेकर, बाबाजी पांडे, लक्ष्मण शिंदे, विक्रम हेमाडे, बळीराम वाडेकर, कैलास खांडेभर, सुभाष प्रधान, सुभाष देशमुख आदी उपस्थित होते. पिंपरी-चिंचवड शहराची वाढती पाण्याची गरज लक्षात घेऊन ठोकळवाडी धरणातील पाण्याचा वापर करण्याबाबत शासनस्तरावर हालचाली सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. यासंदर्भात धरणातील पाण्याचे नियोजन करण्याबाबत प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्याचेही सांगण्यात येत आहे. यामुळे ठोकळवाडी धरणाच्या निर्मितीपासून आजपर्यंत अनेक वर्षे उलटूनही धरणग्रस्तांच्या समस्या कायम असल्याने स्थानिकांमध्ये नाराजी आहे. धरणासाठी जमिनी दिल्या, शेती आणि घरे गमावली. त्यानंतरही पिण्याचे पाणी, रस्ते आणि इतर मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत आहे. धरणासाठी त्याग केलेल्या स्थानिक नागरिकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करून केवळ शहराच्या पाणीपुरवठ्याचा विचार करणे अन्यायकारक असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. मागण्यांसाठी यापूर्वीही आंदोलने करण्यात आली होती. त्या वेळी प्रशासनाकडून आश्वासने देण्यात आली. मात्र, प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. त्यामुळे आता पाणी वळविण्याच्या प्रस्तावावर निर्णय घेण्यापूर्वी धरणग्रस्तांच्या सर्व प्रलंबित प्रश्नांवर ठोस तोडगा काढावा, अशी मागणी जोर धरत आहे. या धरणासाठी त्याग करणाऱ्या ग्रामस्थांना न्याय मिळाल्याशिवाय ठोकळवाडीचे पाणी शहराकडे वळविण्याचा निर्णय घेऊ नये, अशी आंदर मावळच्या ग्रामस्थांची ठाम भूमिका असल्याचे उपस्थितांनी सांगितले.

पिंपरी-चिंचवडमधील झोपडपट्टीवासीय महिलांची दिवाळी होणार गोड

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी-चिंचवड शहरातील घोषित आणि अघोषित झोपडपट्टीत राहणाऱ्या नागरिकांची दिवाळी गोड होणार आहे. महापालिकेच्या वतीने झोपडपट्टीतील रहिवाशांना चादर, बेडशीट, ब्लँकेट, पिलो कव्हर, सतरंजी, बस्कर सतरंजी, नॅपकिन, स्वेटर, कापडी पिशवी, साडी व इतर साहित्य असे संसारोपयोगी साहित्य तेथील सज्ञान महिलांना मोफत वितरीत केले जाणार आहे. महापालिकेच्या समाज विकास विभागाकडून शहरातील घोषित व अघोषित झोपडपट्टीत वास्तव्यास असलेल्या सज्ञान महिलांना या साहित्यांचे वितरण केले जाते. इतर कल्याणकारी याजेनेतून यावर खर्चा केला जातो. शासन दर निश्चितीनुसार सोलापूर येथील श्री जगदंबा महिला रेडिमेड ड्रेसेस, विविध उत्पादन सहकारी औद्योगिक संस्था मर्यादित या संस्थेमार्फत हे संसारोपयोगी साहित्य खरेदी करण्यात येणार आहे. ही संस्था अंध, अपंग व दिव्यांगाकरिता कार्यरत आहे. शालेय गणवेश व इत साहित्य शासन दराने खरेदी करण्याचे आदेश त्या संस्थेला 27 सप्टेंबर 2023 ला देण्यात आले आहेत.

निगडीतील घरकुल योजनेतील ७२० लाभार्थ्यांना न्याय द्या

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी -चिंचवड महापालिकेच्या निगडी, रुपीनगर, सेक्टर क्रमांक 22 येथील घरकुल योजनेत गेल्या 15 वर्षांपासून नऊ इमारतींचा प्रश्न प्रलंबित आहे. तो प्रश्न तातडीने मार्गी लावून 720 पात्र लाभार्थ्यांना न्याय मिळवून द्यावा, असे साकडे थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना घालण्यात आले आहे. महापालिकेने सन 2008-09 मध्ये निगडी येथील सेक्टर क्रमांक 22 परिसरात जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत घरकुल पुनर्वसन योजना राबवली. आर्थिकदृष्ट्या दुर्बल व पात्र लाभार्थ्यांना हक्काचे घर उपलब्ध करून देण्याचा उद्देश होता. मात्र, प्रशासकीय उदासीनता व न्यायालयीन प्रकरणाच्या प्रलंबित स्थितीमुळे या योजनेतील 720 पात्र लाभार्थ्यांना गेल्या अनेक वर्षांपासून हक्काच्या घरापासून वंचित राहावे लागत आहे. प्रकल्पात नऊ इमारतींचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. मात्र, एका माजी नगरसेविकेने संबंधित जागा रेड झोन हद्दीत येत असल्याचा व तेथील बांधकाम बेकायदेशीर असल्याचा दावा करीत मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेच्या अनुषंगाने न्यायालयाने संबंधित प्रकल्पाबाबत स्थगिती आदेश दिल्याने बांधकाम पूर्ण होऊनही या इमारतींचा ताबा लाभार्थ्यांना देता आलेला नाही, असा आरोप भाजपचे कार्यकर्ते सचिन काळभोर यांनी केला आहे. गेल्या 15 वर्षांपासून या नऊ इमारती वापराविना धूळखात पडून आहेत. दुसरीकडे, या योजनेतील 720 पात्र लाभार्थी आजही स्वतःच्या घराच्या प्रतीक्षेत असून, त्यांना घर मिळवण्यासाठी प्रशासनाचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. सामान्य नागरिकांच्या घराच्या स्वप्नाचा प्रश्न इतकी वर्षे प्रलंबित राहणे ही गंभीर बाब आहे.

दिशा फाऊंडेशनच्या दशकपूर्ती दिवाळी फराळाला दिग्गजांची मांदियाळी

■ पिंपरी (दै. संध्या)



सततचे हेवेदावे, आरोप प्रत्यारोप, वर्चस्ववाद, कुरघोडीचे राजकारण...सगळं काही बाजूला ठेवून राजकीय पक्षांचे दिग्गज नेते, प्रशासकीय अधिकारी, सांस्कृतिक, शैक्षणिक यासह पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शनिवारी (७ नोव्हेंबर) एकत्रितपणे दिवाळी फराळाचा मनमुराद आनंद घेतला. दिशा सोशल फाऊंडेशनच्या 'दिवाळी फराळाची' यंदा दशकपूर्ती होती. यानिमित्ताने काळेवाडी तील 'रागा पॅलेस' मध्ये झालेल्या स्नेहमेळाव्यात खेळीमेळीच्या वातावरणात जवळपास साडेतीन तास गप्पांची मैफल रंगली. सर्वांच्या सहभागामुळे दिवाळीचा आनंद द्विगुणित झाला.

पिंपरी चिंचवडचे महापौर रवी लांडगे, मावळचे खासदार श्रीरंग बारणे, माजी खासदार अमर साबळे, आमदार महेश लांडगे, शंकर जगताप,बापूसाहेब पठारे, शंकर मांडेकर, अमित गोरखे, माजी आमदार विलास लांडे, गौतम चाबुकस्वार, पुण्याचे निवृत्त विभागीय आयुक्त दिलीप बंड, पिंपरी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर आदी उपस्थित होते. याशिवाय, भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष योगेश बहल, मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले, शिवसेनेचे शहराध्यक्ष चेतन पवार, राष्ट्रवादीचे (शरदचंद्र पवार पक्ष) शहराध्यक्ष देवेंद्र तायडे, आर.पी.आय.चे शहराध्यक्ष नगरसेवक कुणाल वाव्हळकर, काँग्रेसचे शहराध्यक्ष नरेंद्र बनसोडे, माजी शहराध्यक्ष वसंत लोंढे, अजित गव्हाणे, सचिन साठे, सदाशिव खाडे, नगरसेवक राहुल कलाटे, नाना काटे, विनोद नढे, अमित गावडे, सुरेश भोईर, तुषार हिंगे, माजी नगरसेवक धनंजय काळभोर, सुजीत पाटील, यशवंत भोसले, शिक्षण मंडळाचे माजी सभापती निवृत्ती शिंदे, विष्णुपंत नेवाळे, माणिकराव अहिरराव, महेश कुलकर्णी, राजेंद्र बाबर, अमित बाबर, निलेश शिंदे, अनिल लोंढे, हेमंत फुगे, उमेश लोंढे, रमेश काशीद, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे उपाध्यक्ष सुनील चांदेरे. राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे, राष्ट्रवादी युवकचे प्रदेशाध्यक्ष विशाल वाकडकर, महेश कुलकर्णी, इंद्रायणी बँकेचे संस्थापक अॅड. एस. बी. चांडक, प्रेरणा बँकेचे अध्यक्ष कांतीलाल गुजर, उद्योजक कृष्णकुमार गोयल, वसंत काटे, विजय जगताप, उमेश चांदगुडे, मनोज जरे, अशोक पुजारी, पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, शिक्षणाधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर, भंडारा डोंगर ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब काशीद, पुणे विद्यापीठ मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सांगळे, पिंपरी पालिकेचे नगरसचिव उल्हास जगताप, उपायुक्त अण्णा बोदडे, जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, गणेश कवठेकर, नाट्य निर्माता संघाचे अध्यक्ष राहुल भंडारे, लेखक दिग्दर्शक संतोष पवार, राजेश शिंदे, नितीन धुंदुके, 'कलोपासक'चे प्रदीप पाटसकर, 'लीड मीडिया'चे प्रमुख विनोद सातव, किमया 'कम्युनिकेशन्स'चे जयंत शिंदे आदी उपस्थित होते. दिशा सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष बाळासाहेब जवळकर यांनी स्वागत केले. राजेंद्र करपे, संतोष बाबर, नंदकुमार कांबळे, संतोष निंबाळकर, गोरख भालेकर, नाना शिवले, सचिन साठे आदींसह दिशा सोशल फाउंडेशनच्या सर्व सदस्यांनी संयोजन केले. सूत्रसंचालन अक्षय मोरे आणि आभार बाजीराव लोखंडे यांनी मानले.दिशा सोशल फाऊंडेशनच्या 'दशकपूर्ती दिवाळी फराळ' उपक्रमाचे औचित्य साधून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्ती तसेच संस्थांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ हलवाई ट्रस्टच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल महेश सूर्यवंशी यांचा सत्कार सेवानिवृत्त विभागीय आयुक्त दिलीप बंड व आमदार महेश लांडगे, शंकर जगताप यांच्या हस्ते करण्यात आला.

चिंचवड येथील आगीच्या प्रसंगी धाडस दाखवून अनेकांचे प्राण वाचवणाऱ्या आर्या विजय कांबळे या धाडसी युवतीचा सत्कार महापौर रवी लांडगे आणि आयुक्त विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आला. पुण्यात सलग सात प्रयोग करून विश्व विक्रमाची नोंद करणारे आणि हजाराव्या प्रयोगांचा टप्पा गाठलेले लोकप्रिय बालनाट्य 'अलबत्या-गलबत्या' टीमचा सत्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

स्वर्गीय लांडगे यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



■ पिंपरी (दै. संध्या)

भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते आणि भाजपचे दिवंगत शहराध्यक्ष स्वर्गीय अंकुशराव लांडगे यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज भाजपच्या पिंपरी-चिंचवड शहर कार्यालयात अभिवादन करण्यात आले होते.

यावेळी भाजपचे विद्यमान शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या हस्ते स्वर्गीय अंकुशराव लांडगे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी जिल्हा महामंत्री मोरेश्वर शेडगे, मधुकर बच्चे, नगरसेवक निखिल बोऱ्हाडे, चंद्रकांत नखाते, भाजप प्रवक्ते राजाभाऊ दुर्गे, संतोष तापकीर, देवदत्त लांडे, रवींद्र देशपांडे, दिलीप राऊत, रवींद्र नांदुरकर, रामदास काळजे, संजय परळीकर, मनीष पंजाबी, नंदूकाका भोगले यांच्यासह भाजपचे प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी स्वर्गीय अंकुशराव लांडगे यांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांना आदरांजली अर्पण केली.

शाळांमध्ये शिक्षक भरतीला वेग; १३० उमेदवारांना नियुक्तीपत्रे

■ पिंपरी(दै. संध्या)

महापालिकेच्या शाळांमधील शिक्षक पदभरती प्रक्रियेला गती मिळाली असून, शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी २०२५ च्या आधारे पवित्र पोर्टलमार्फत शिफारस झालेल्या उमेदवारांचे समुपदेशन पूर्ण करण्यात आले आहे.

या प्रक्रियेत मराठी, हिंदी आणि उर्दू माध्यमांतील एकूण १३९ उमेदवारांचे समुपदेशन करण्यात आले. त्यापैकी १३० उमेदवारांना नियुक्तीपत्रांचे वितरण सुरू करण्यात आल्याची माहिती शिक्षण विभागाच्या उपायुक्त ममता शिंदे यांनी दिली. चिंचवड येथील प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीज येथे ही प्रक्रिया पार पडली. पहिल्या व दुसऱ्या फेरीत शिफारस झालेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर शासनाच्या निर्धारित निकषांनुसार दिव्यांग, महिला आणि इतर उमेदवारांना त्यांच्या गुणानुक्रमानुसार समुपदेशनाची संधी देण्यात आली. उपलब्ध रिक्त पदे, माध्यम आणि पदनिहाय उमेदवारांना नियुक्तीसाठी संधी देण्यात आली. समुपदेशन प्रक्रियेत एक उमेदवार शैक्षणिक अर्हतेच्या कारणास्तव अपात्र ठरला आहे. या भरती प्रक्रियेतील विशेष बाब म्हणजे महापालिकेच्या शाळांमध्ये शिक्षण घेतलेल्या दोन माजी विद्यार्थ्यांची शिक्षकपदी निवड झाली आहे. ज्या शाळांमध्ये शिक्षण घेतले, त्याच शिक्षण व्यवस्थेत शिक्षक म्हणून सेवा करण्याची संधी मिळणे ही शैक्षणिक वाटचालीसाठी अभिमानास्पद बाब मानली जात आहे.

पिंपरी-चिंचवडमध्ये १० कचरा प्रक्रिया केंद्रांचा प्रस्ताव

■ पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवड शहरात दहा ठिकाणी कचरा प्रक्रिया केंद्र सुरू करण्यात येणार आहेत. त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याचे काम सुरू आहे. मात्र, राष्ट्रीय हरित लवाद (एनजीटी) आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाची परवानगी घेतल्यानंतरच सर्व प्रकल्प सुरू करता येणार आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष केंद्र सुरू होण्यास विलंब होण्याची शक्यता आहे.

महापालिकेच्या मोशी कचरा डेपोतील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पातील अनधिकृत प्रशासकीय इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेत 9 कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला तर, काही कर्मचारी जखमी झाली. ती घटना 8 जुलैला घडली. त्यानंतर मोशी डेपोत कचरा टाकणे बंद झाले होते. परिणामी, संपूर्ण शहरात कचरा कोंडीची समस्या निर्माण झाली. कचरा कोठे डंप करायचा, हा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. तात्पुरता पर्याय म्हणून सध्या मोशी डेपोतच कचरा डंप केला जात आहे. मोशी डेपोवरील ताण कमी करण्यासाठी शहरातील दहा क्षेत्रीय कार्यालयात एक असे एकूण दहा ठिकाणी कचरा प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी जुलै महिन्यातील सर्वसाधारण सभेत जाहीर केले होते. प्रशासनाकडून शहरातील रिकाम्या जागांचा शोध घेऊन दहा जागांची यादी आयुक्तांनी 13 सप्टेंबरला जाहीर केली.

ना ओटीपी, ना लिंक तरीही बँक खाते रिकामे; ॲप्समधून मोबाईलमध्ये सायबर चोरट्यांचा शिरकाव

■ पिंपरी (दै. संध्या)



सायबर फसवणूक टाळण्यासाठी कोणालाही ओटीपी सांगू नका, अनोळखी लिंकवर क्लिक करू नका, अशा सूचना वारंवार दिल्या जातात, मात्र कोणताही ओटीपी शेअर केला नाही किंवा संशयास्पद लिंक उघडली नाही, तरीही बँक खात्यातून पैसे गायब झाल्याच्या तक्रारींमुळे सायबर सुरक्षेचा नवा प्रश्न निर्माण झाला आहे.

मोबाईलमध्ये नकळत इन्स्टॉल झालेल्या घातक ॲप्सच्या माध्यमातून संवेदनशील माहिती चोरून आर्थिक फसवणूक झाल्याचे तपासात समोर आले आहे. विशेषतः अनधिकृत वेबसाइटवरून डाउनलोड केलेले गेम्स आणि थर्ड पार्टी ॲप्समुळे नागरिकांच्या बँक खात्यांना धोका निर्माण होत असल्याचे सायबर तज्ज्ञांचे मत आहे. सायबर गुन्हेगार फसवणुकीसाठी सातत्याने नवनवीन तंत्रांचा वापर करीत आहेत. आर्थिक फसवणूक झाल्यानंतर पोलिसांकडे धाव घेणारे काही तक्रारदार आपण कोणालाही ओटीपी सांगितलेला नाही, बँकेची गोपनीय माहिती दिलेली नाही किंवा कोणत्याही अनोळखी लिंकवर क्लिक केलेले नाही, असे सांगतात.

त्यामुळे खात्यातून पैसे नेमके गेले कसे?, असा प्रश्न उपस्थित होतो. अशा प्रकरणांमध्ये मोबाईलमधील घातक सॉफ्टवेअर, ॲप्सना दिलेल्या परवानग्या या फ्रॉडचा महत्त्वाचा धागा ठरतो आहे.

मोफत गेम्स, फोटो एडिटिंग, चित्रपट पाहणे, आकर्षक ऑफर्स किंवा प्रीमियम सुविधांच्या नावाखाली अनधिकृत ॲप्स डाउनलोड करण्यास प्रवृत्त केले जाते. काही घातक ॲप्स इन्स्टॉल करताना एसएमएस, नोटिफिकेशन, स्क्रीनवरील मजकूर वाचणे तसेच मोबाईल नियंत्रित करण्याच्या परवानग्या मागतात. वापरकर्त्याने विचार न करता त्या दिल्यास सायबर गुन्हेगारांना संवेदनशील माहिती मिळविण्याची संधी मिळत आहे. काही प्रकारच्या मालवेअरच्या माध्यमातून स्क्रीनवरील हालचाली पाहणे, लॉगिन माहिती चोरणे किंवा आर्थिक व्यवहारांच्या प्रमाणीकरण प्रक्रियेत हस्तक्षेप करणे शक्य होत आहे.

पीसीसीओई ला आयआयसी संस्थेचा "फोर स्टार" मानांकनाचा पुरस्कार : लांडगे

■ पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालयाला आयआयसी संस्थेचा "फोर स्टार" मानांकनाचा पुरस्कार मिळणे पीसीईटीच्या व्यवस्थापनाचा सन्मान आहे असे पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे यांनी सांगितले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालयाला नुकताच केंद्रीय शिक्षण मंत्रालय, एआयसीटीई, नवोन्मेष कक्ष, संस्थेची नवोन्मेष परिषद (आयआयसी) यांच्या वतीने "फोर स्टार रेटिंग" असणारा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पीसीसीओई ने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या वर्षात कॅम्पस मध्ये नवोन्मेष आणि स्टार्ट अपला प्रोत्साहन देण्यासाठी भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या नवोन्मेष कक्षाने निर्धारित केलेले विविध उपक्रम यशस्वीपणे राबविले होते. त्याची दखल घेऊन आयआयसी ने "फोर स्टार रेटिंग" प्रमाणपत्र देऊन गौरव केला. एआयसीटीई चे अध्यक्ष प्रा. टी. जी. सीताराम; शिक्षण मंत्रालय, नवोन्मेष कक्ष मुख्य नवोन्मेष अधिकारी डॉ. अभय जेरे आणि शिक्षण मंत्रालय, नवोन्मेष कक्ष सहायक नवोन्मेष संचालक दिपान साहू यांनी प्रमाणपत्र देऊन पीसीसीओई व्यवस्थापनाचा सन्मान केला.

पीसीईटीचे सचिव विठ्ठल काळभोर यांनी सांगितले की, हा पुरस्कार म्हणजे पीसीसीओईच्या मुकुटात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे. पीसीसीओईने या वर्षी राष्ट्रीय स्तरावरील ॲस्ट्रोव्हर्स अक्षयन २०२६ स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. फॉर्म्युला भारत या आंतरराष्ट्रीय स्पर्धा मध्ये व्यवसाय योजना सादरीकरणात तिसरे स्थान मिळवले. तसेच नॅशनल इनोव्हेशन चॅलेंज फॉर ड्रोन ॲप्लिकेशन अँड रिसर्च या राष्ट्रीय स्पर्धा मध्ये अखिल भारतीय स्तरावर दुसरा क्रमांक मिळवला आहे. इंटरनॅशनल रोव्हर चॅलेंज २६ मध्ये 'इमर्जिंग टीम ऑफ द इयर' आणि जागतिक क्रमवारीत १२ वा क्रमांक मिळवला आहे अशी पीसीसीओईची दैदीप्यमान कामगिरी आहे.

पीसीईटीचे खजिनदार शांताराम गराडे यांनी या विषयी कौतुक करताना सांगितले की, पीसीसीओई ने राष्ट्रीय स्तरावरील ई-बाजा एसएई इंडिया या स्पर्धे मध्ये एकूण द्वितीय उपविजेतेपद मिळवले आहे यामध्ये स्टॅटिक्स, डायनॅमिक्स, एंड्युरन्स, मॅन्युफॅक्चरिंग एक्सलन्स आणि सेल्स या पुरस्कारांचा समावेश आहे. पीसीसीओई च्या विद्यार्थ्यांची अशी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील लक्षवेधी कामगिरी हे पीसीसीओई संचालक, प्राचार्य डॉ. गोविंद कुलकर्णी तसेच सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक वर्ग आणि विद्यार्थी यांचे सामूहिक यश आहे.

पीसीईटी अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, नियामक मंडळाचे सदस्य नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीसीओई संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी या यशाबद्दल पीसीसीओई टीमचे अभिनंदन केले.

थोडक्यात पण महत्वाचे



नवीन ॲपमध्ये ७५० गट गायब; निमोणेची पीक पाहणी ठप्प!

शिरूर : दैनिक संध्या

निमोणे (ता. शिरूर) येथील गट नंबर १ ते ६४५ आणि १०८९ ते १११६ असे सुमारे ७५० गट नवीन पीक पाहणी ॲपमधून गायब झाल्याचा प्रकार समोर आला आहे. १ ऑगस्ट २०२६ पासून नवीन महसूल हंगाम सुरू होऊनही सेंट्रलच्या DCS MH ॲपमध्ये संबंधित गट क्रमांक उपलब्ध नसल्याने निमोणेतील पीक पाहणी प्रक्रिया पूर्णतः ठप्प झाली आहे. तब्बल तीन महिन्यांहून अधिक काळ उलटूनही ही तांत्रिक अडचण दूर झालेली नसल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. २०२५-२६ या महसूल वर्षापर्यंत जुन्या ई-पीक पाहणी ॲपमध्ये निमोणेतील सर्व संबंधित गट पीक नोंदणीसाठी उपलब्ध होते. मात्र, नवीन महसूल हंगामापासून DCS MH ॲप कार्यान्वित झाल्यानंतर हे गटच प्रणालीत दिसेनासे झाले. त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या शेतातील पिकांची नोंद करता येत नाही. जुन्या प्रणालीत व्यवस्थित उपलब्ध असलेले गट नवीन प्रणालीतून अचानक गायब कसे झाले, असा प्रश्न उपस्थित होत आहे. पीक पाहणी ही केवळ पिकांची नोंद नसून शेतकऱ्यांच्या विविध आर्थिक आणि शासकीय लाभांशी निगडित महत्त्वाची प्रक्रिया आहे. पीक नोंदणी रखडल्याने शेतकऱ्यांना सोसायटीच्या माध्यमातून मिळणाऱ्या सुविधांसह विहीर, बोअरवेल नोंदी आणि विविध शासकीय कृषी योजनांचा लाभ घेताना अडचणी येत आहेत. आवश्यक पीक नोंदी उपलब्ध नसल्याने अनेक शेतकरी योजनांच्या लाभापासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली आहे. परिणामी, शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असून शेतीच्या कामातही अडथळे निर्माण होत आहेत. नवीन ॲप सुरू करताना जुन्या पीक पाहणी प्रणालीतील गटांची माहिती योग्य प्रकारे अद्ययावत करण्यात आली होती का, याची तपासणी झाली का, असा सवाल शेतकरी उपस्थित करीत आहेत. ॲपमधील तांत्रिक त्रुटी किंवा प्रशासकीय दिरंगाईचा फटका सर्वसामान्य शेतकऱ्यांना बसत आहे. शेतकऱ्यांनी वारंवार प्रयत्न करूनही गट क्रमांक उपलब्ध होत नसल्याने पीक पाहणी करायची तरी कशी, असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला आहे. महसूल विभागाने या गंभीर प्रश्नाकडे तातडीने लक्ष देऊन निमोणेतील संबंधित ७५० गटांची DCS MH ॲपमध्ये नोंद उपलब्ध करून द्यावी. रखडलेली पीक पाहणी करण्यासाठी विशेष संधी उपलब्ध करून द्यावी आणि या तांत्रिक त्रुटीमुळे शेतकऱ्यांचे कोणतेही शासकीय लाभाचे नुकसान होऊ नये, यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

उपनगराध्यक्षपदी नितीन पाचर्णे बिनविरोध!

शिरूर : दैनिक संध्या

शिरूर नगरपालिकेच्या राजकारणात महत्त्वाची घडामोड घडली असून, भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक नितीन पाचर्णे यांची शुक्रवारी (दि. ६) उपनगराध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली. नगरपालिकेच्या रसिकलाल धारिवाल सभागृहात झालेल्या विशेष सभेत त्यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्यांच्या निवडीची घोषणा केली. विशेष म्हणजे, नगराध्यक्ष आणि उपनगराध्यक्ष अशी दोन्ही महत्त्वाची पदे एकाच पाचर्णे परिवाराकडे आल्याने शिरूरच्या राजकीय वर्तुळात या निवडीची विशेष चर्चा सुरू झाली आहे. शिरूर नगरपालिकेच्या २४ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत भाजपने ११ जागा जिंकत सर्वाधिक संख्याबळ मिळवले होते. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाला सात, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाला पाच, तर एका जागेवर अपक्ष उमेदवार विजयी झाला होता. या अपक्ष नगरसेवकाने अजित पवार गटाला पाठिंबा दिला होता. सत्तास्थापनेच्या वेळी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र येत 'शिरूर नगरपरिषद गट' स्थापन करून सत्तेत आले होते. त्यामुळे सर्वाधिक जागा मिळवूनही भाजपला विरोधी बाकांवर बसावे लागले होते. नगराध्यक्षपदी अजित पवार गटाच्या ऐश्वर्या अभिजित पाचर्णे या थेट जनतेतून निवडून आल्या होत्या. दरम्यान, सत्तेच्या समीकरणात झालेल्या बदलानंतर भाजपने शिरूर नगरपरिषद गटाला पाठिंबा जाहीर केला. त्यानंतर उपनगराध्यक्ष मितेश गादिया यांच्याविरोधात अविश्वास ठराव मांडण्यात आला. हा ठराव मंजूर झाल्याने उपनगराध्यक्षपद रिक्त झाले होते. या पार्श्वभूमीवर शुक्रवारी उपनगराध्यक्षपदासाठी विशेष सभा घेण्यात आली. भाजपचे शहराध्यक्ष नितीन पाचर्णे यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची बिनविरोध निवड निश्चित झाली.

प्रत्येक दिवाळीत हुंडाबळीच्या घटना घडणे ही समाजासाठी वेदनादायी बाब

खेड शिवापूर: दैनिक संध्या

"प्रत्येक दिवाळीत हुंड्यासाठी छळ झालेल्या मुलींच्या मृत्यूच्या घटना समोर येणे ही अत्यंत वेदनादायी बाब आहे. लक्ष्मीपूजन करताना माझी एकच प्रार्थना असते की, महाराष्ट्रात एकही मुलगी हुंड्याची बळी ठरू नये. ज्या दिवाळीत एकही हुंडाबळी घडणार नाही, तीच माझ्यासाठी खरी दिवाळी असेल," अशा भावनिक शब्दांत शिवसेना नेत्या, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सदस्या तथा माजी उपसभापती आणि स्त्री आधार केंद्राच्या अध्यक्षा डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. पुणे जिल्ह्यातील खेड शिवापूर परिसरातील श्रीरामनगर येथे पायल झांबरे यांच्या माहेरी जाऊन डॉ. गोऱ्हे यांनी पवार कुटुंबीयांची भेट घेतली. पायल यांच्या मृत्यूबद्दल दुःख व्यक्त करत त्यांनी कुटुंबीयांचे सांत्वन केले आणि संपूर्ण घटनेची माहिती घेतली. या प्रकरणात न्याय मिळेपर्यंत कुटुंबीयांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख रमेश कोंडे, महिला आघाडी संपर्कप्रमुख कांता पांढरे, युवासेना जिल्हाप्रमुख निलेश घारे, स्त्री आधार केंद्र संस्थेच्या अनिता शिंदे, आक्षेषा खंडागळे, मेघना गिडनावर आदी उपस्थित होते. पायल यांच्या मृत्यूमागे हुंड्यासाठी छळ, मानसिक त्रास आणि आत्महत्येस प्रवृत्त केल्याचे गंभीर आरोप आहेत. या प्रकरणातील शवविच्छेदन अहवाल, मोबाईल संभाषणे, आर्थिक व्यवहार आणि इतर सर्व पुरावे तपासून सखोल चौकशी करण्यात यावी.

जनाबाई गोरे यांचे निधन

चाकण : दैनिक संध्या



येथील जुन्या पिढीतील महिला कार्यकर्त्या जनाबाई मुरलीधर गोरे (वय ९७) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. उद्योजक मच्छिंद्र गोरे व संजय गोरे यांच्या त्या मातोश्री होत.

चाकण बाजारात गवार, शेवगा, दुधी भोपळा, कोबी, फ्लावर, वांगी व वाटाण्याची उच्चांकी आवक

■ चाकण (दै. संध्या)

खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये गवार, शेवगा, दुधी भोपळा, कोबी, फ्लॉवर, वांगी व वाटाण्याची उच्चांकी आवक झाली. पालेभाज्या व फळभाज्यांचे भाव कोसळले. एकूण उलाढाल ६ कोटी ५० लाख रुपये झाली. चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक ९०० क्विंटल झाली. कांद्याला कमाल भाव ४,४०० रुपये मिळाला. बटाट्याची एकूण आवक १,७०० क्विंटल झाली.

बटाट्याचा कमाल भाव १,६०० रुपयांवर स्थिर राहिला. लसणाची एकूण आवक ३० क्विंटल झाली. लसणाचा कमाल भाव १८ हजार रुपयांवर स्थिर राहिला. हिरव्या मिरचीची एकूण आवक ३४० क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ३ हजार रुपयां पासून ते ५ हजार रुपयांपर्यंत कमाल भाव मिळाला.

शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे : कांदा - एकूण आवक - ९०० क्विंटल. भाव क्रमांक - १. ४,४०० रुपये, भाव क्रमांक २. ३,७०० रुपये, भाव क्रमांक ३. १,७०० रू. बटाटा - एकूण आवक - १,७०० क्विंटल.भाव क्रमांक १. १,६०० रुपये, भाव क्रमांक २.१,१०० रुपये, भाव क्रमांक ३.८०० रुपये.

फळभाज्या : फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे -

टोमॅटो - ३४९ क्विंटल (७०० ते १,२०० रू.), कोबी - २१० क्विंटल (४०० ते ६०० रू.), फ्लॉवर - २३० क्विंटल (४०० ते ६०० रु.), वांगी - ७२ क्विंटल (१,००० ते २,५०० रु.), भेंडी - ७६ क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), दोडका - ४८ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), कारली - ५६ क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), दुधीभोपळा - ५० क्विंटल (१,००० ते १,५०० रु.), काकडी - ८० क्विंटल (१,००० ते २,००० रु.), फरशी - ३२ क्विंटल (३,००० ते ४,००० रु.), वालवड - ४८ क्विंटल (३,००० ते ४,५०० रुपये), ढोबळी मिरची - १२६ क्विंटल (२,००० ते ४,००० रु.), चवळी - ३६ क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), शेवगा - १० क्विंटल (५,००० ते ८,००० रु.), गाजर - १९० क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), गवार - ३६ क्विंटल (३,००० ते ५,००० रु.), आले - १६० क्विंटल (४,००० ते ६,००० रु.), वाटाणा - ३५ क्विंटल (८,००० ते ११,००० रु.



दिलेला शब्द पाळण्यासाठी सोसायटी पदाधिकाऱ्यांचा स्वखर्च!

■ शिरूर (दै. संध्या)



शिंदोडी (ता. शिरूर) येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी दिवाळीच्या निमित्ताने सभासदांना दिलेला शब्द स्वखर्चातून पूर्ण करीत सहकारातील विश्वास आणि बांधिलकीचे दर्शन घडविले. संस्थेच्या सर्व सभासदांना प्रत्येकी पाच किलो साखर देण्याचे आश्वासन लाभांश वाटप कार्यक्रमात देण्यात आले होते. मात्र, सहकारी संस्थेच्या नियमानुसार १५ टक्के लाभांश वाटपाची मर्यादा पूर्ण झाल्याने संस्थेच्या निधीतून साखर वाटप करणे शक्य नव्हते. अशा परिस्थितीत संस्थेचे माजी चेअरमन एकनाथ (आबा) वाळुंज यांनी पुढाकार घेत विद्यमान चेअरमन, व्हाईस चेअरमन आणि सर्व संचालक मंडळाच्या सहकार्याने स्वतःच्या खर्चातून सभासदांना साखर वाटप केले.

लाभांश वाटप कार्यक्रमात जाहीर केलेले आश्वासन पूर्ण करण्यासाठी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसमोर आर्थिक आणि कायदेशीर मर्यादांचे आव्हान होते. संस्थेच्या निधीचा नियमबाह्य वापर न करता सभासदांना दिलेला शब्द पाळण्याचा निर्णय घेण्यात आला. माजी चेअरमन एकनाथ (आबा) वाळुंज यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यमान चेअरमन शिवाजीराव दिलीप ओव्हाळ, व्हाईस चेअरमन सावित्राबाई बबन वाळुंज आणि सर्व संचालक मंडळाने एकत्रितपणे वैयक्तिक खर्चातून साखर वाटपाचा उपक्रम राबविला. संस्थेच्या निधीपेक्षा सभासदांचा विश्वास महत्त्वाचा मानत पदाधिकाऱ्यांनी घेतलेला हा निर्णय सहकार क्षेत्रासाठी आदर्शवत ठरत आहे. केवळ आश्वासने देण्यापेक्षा दिलेला शब्द कृतीतून पाळण्याची भूमिका त्यांनी घेतली. या उपक्रमामुळे सभासदांशी असलेले जिव्हाळ्याचे नाते अधिक दृढ झाले असून, संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या या सामाजिक बांधिलकीचे शिंदोडी परिसरातून कौतुक होत आहे.

बोरी-पंढरपूर एसटी बस बंद करण्याच्या निर्णयाची चौकशी करण्याची मागणी

■ बोरी (दै. संध्या)

बोरी-पंढरपूर एसटी बससेवा २३ ऑक्टोबरपासून प्रवासी संख्या कमी आणि उत्पन्न मिळत नसल्याचे कारण देत नारायणगाव आगार प्रमुखांनी बंद केली आहे. मात्र, केवळ आर्थिक उत्पन्नाचा विचार करून ग्रामीण भागातील महत्त्वाची बससेवा बंद करणे अन्यायकारक असल्याची भूमिका सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र भोर यांनी घेतली आहे. ही बससेवा तातडीने पूर्ववत सुरू करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

या बससेवेचा बोरी, साळवाडी व परिसरातील अनेक गावांतील विद्यार्थी, शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य प्रवाशांना मोठा फायदा होत होता. पुणे व पंढरपूर येथे जाण्यासाठी ही बस महत्त्वाची होती. बससेवा बंद झाल्यामुळे प्रवाशांना खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत असून आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

या निर्णयाच्या निषेधार्थ राजेंद्र भोर यांनी ७ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या पुणे विभागातील संनियंत्रण समितीचे अध्यक्ष तथा सदस्य सचिव यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. बस बंद करण्याचा निर्णय कोणत्या अधिकाऱ्याने घेतला, वरिष्ठांची परवानगी घेतली होती का, बसचे प्रत्यक्ष उत्पन्न, प्रवासी संख्या व खर्च किती होता, याची सखोल चौकशी करावी. तसेच बसच्या जाण्या-येण्याच्या मार्गावरील लॉगशीट व तपासणी अहवाल उपलब्ध करून द्यावा आणि नारायणगाव आगारप्रमुखांनी लेखी खुलासा द्यावा, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

ग्रामीण जनतेच्या वाहतुकीचा प्रश्न लक्षात घेऊन बससेवा तातडीने सुरू करावी; अन्यथा लोकशाही मार्गाने पुढील पाठपुरावा करण्यात येईल, असा इशारा भोर यांनी दिला आहे.

ग्रामीण रुग्णालयाच्या कामाची आ. कुल यांनी केली पाहणी

■ दौड (दै. संध्या)



वरवंड, ता. दौंड येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे ३० खाटांच्या अत्याधुनिक ग्रामीण रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याच्या कामाला राज्य शासनाकडून मंजुरी मिळाली असून, या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे प्रत्यक्ष बांधकाम जोरदार सुरू आहे. सुमारे ३० कोटी रुपये खर्चाच्या या रुग्णालय इमारत आणि अधिकारी - कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांच्या कामाची आमदार राहुल कुल यांनी आज प्रत्यक्ष वरवंड येथे भेट देऊन पाहणी केली.

ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्याच परिसरात दर्जेदार आणि उच्च दर्जाच्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देणे हे आपले सर्वोच्च प्राधान्य असल्याचे यावेळी आमदार राहुल कुल यांनी स्पष्ट केले. वरवंड व पंचक्रोशीतील गावांमधील नागरिकांना उपचारासाठी यापुढे दूरवर जावे लागणार नाही, यादृष्टीने हे रुग्णालय अत्यंत वरदान ठरणार आहे.

कामाच्या पाहणीदरम्यान आमदार कुल यांनी उपस्थित संबंधित शासकीय अधिकारी, अभियंता व कंत्राटदारांची बैठक घेऊन सक्त सूचना दिल्या. बांधकामाचा दर्जा चांगला राखला जावा आणि हा संपूर्ण प्रकल्प निश्चित केलेल्या कालमर्यादेत (वेळेत) पूर्ण करावा, असे स्पष्ट निर्देश त्यांनी यावेळी दिले. कामाच्या गुणवत्तेबाबत व वेळेबाबत कोणतीही कसूर खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. या अत्याधुनिक ग्रामीण रुग्णालयामुळे दौंड तालुक्याच्या ग्रामीण भागातील आरोग्य यंत्रणेला आणखी मोठे बळ मिळणार आहे.

दिवाळीनिमित्त ज्येष्ठ सभासदांचा फेटा बांधून सन्मान



■ नारायणगाव(दै. संध्या)

दिवाळीचा आनंद सभासदांसोबत साजरा करण्याच्या उद्देशाने वडगाव आनंद विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटीच्या वतीने दिवाळी भेटवस्तू वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थेच्या वतीने ज्येष्ठ सभासदांना फेटा बांधून त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच ज्येष्ठ सभासदांच्या हस्ते इतर सभासदांना दिवाळी भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमातून संस्थेने सभासदांप्रती असलेली आपुलकी आणि जिव्हाळ्याचे नाते जपण्याचा प्रयत्न केला. या कार्यक्रमामुळे सभासदांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष सचिन वाळुंज, उपाध्यक्ष प्रमोद गडगे, ज्येष्ठ संचालक रामदास पादीर, सुरेश देवकर, रोहित गागरे, प्रभाकर काशीकेदार, सुरेश चौगुले, शकुंतला देवकर, श्रीधर शिंदे, अर्चना वाघमारे, स्वप्निल मोरे, रवींद्र भुजबळ यांच्यासह सर्व संचालक व कर्मचारी यांच्या उपस्थितीत दिवाळी भेटवस्तू वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला वडगाव आनंदच्या सरपंच रेलिका जाधव, उपसरपंच संतोष पादीर यांच्यासह कैलास वाळुंज, समीर देवकर, प्रदीप देवकर, शाहीर गणेश वाघमारे, सुरेश गडगे, विजुभाऊ देवकर, अरविंद शिंदे, जालिंदर गागरे, नितीन वाळुंज, ज्ञानेश्वर शिंदे, संतोष साबळे, बाबुराव जनक देवकर, जालिंदर पादिर,कमलेश देवकर, विलास डावखर, बाळासाहेब उर्फ नेते देवकर ,भाऊसाहेब इथापे, राजू चौगुले आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपाध्यक्ष प्रमोद गडगे यांनी केले. अध्यक्ष सचिन वाळुंज यांनी सूत्रसंचालन केले.

कार्तिकी यात्रेसाठी प्रशासन सज्ज; जिल्हाधिकाऱ्यांकडून तयारीचा आढावा

वीज, पाणी, आरोग्य, वाहतूक व सुरक्षेला प्राधान्य; सर्व विभागांना कालबद्ध कामांचे निर्देश

■ आळंदी देवाची (दै. संध्या)

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त १ ते ६ डिसेंबरदरम्यान होणाऱ्या कार्तिकी एकादशी यात्रेच्या पूर्वतयारीसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पुणे येथे उच्चस्तरीय आढावा बैठक घेण्यात आली. यात्रेसाठी देशभरातून लाखो वारकरी आणि भाविक आळंदीत दाखल होणार असल्याने सर्व शासकीय विभागांनी समन्वयाने नियोजन करून कामे निर्धारित वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

बैठकीस आळंदी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, मुख्याधिकारी माधव खांडेकर, डी. डी. भोसले-पाटील, देवस्थान कमिटीचे विश्वस्त चैतन्य महाराज कबीरबुवा, संजय घुंडरे पाटील तसेच पोलीस, आरोग्य, महावितरण, सार्वजनिक बांधकाम आणि जलसंपदा विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यात्राकाळात अखंडित वीजपुरवठ्यासाठी स्वतंत्र फिडर व्यवस्था, तसेच मुख्य पाच दिवसांसाठी अतिरिक्त १० एमएलडी पाणी उपलब्ध करण्याचे नियोजन करण्यात आले. आरोग्य सुविधांसाठी तात्पुरती रुग्णालये, ऑक्सिजन बेड आणि दहा अतिरिक्त फिरते वैद्यकीय बूथ कार्यान्वित करण्याच्या सूचना देण्यात आल्या. अन्न व औषध प्रशासनाने खाद्यपदार्थांच्या दुकानांची विशेष तपासणी करण्याचेही निर्देश दिले.



मंदिर परिसरातील गर्दीचे नियोजन करण्यासाठी सुरक्षित जर्मन हँगर मंडप, दर्शनबारी, स्कायवॉक बॅरिकेडिंग आणि आरएफआयडी पास प्रणालीबाबत चर्चा झाली. वाहतूक व पार्किंग व्यवस्था सक्षम करणे, रस्त्यांवरील खड्डे बुजविणे, अतिक्रमणे हटविणे आणि रिक्षांचे अधिकृत भाडेदर निश्चित करण्याबाबत संबंधित विभागांना सूचना देण्यात आल्या.

भाविकांच्या सुरक्षिततेसाठी २४ तास आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष, अतिरिक्त अग्निशमन वाहने, एनडीआरएफ पथक, पोलीस मदत केंद्रे आणि सुरक्षा तपासणी यंत्रणा कार्यान्वित ठेवण्यावर भर देण्यात आला. इंद्रायणी नदीचे प्रदूषण रोखणे, घाटांची स्वच्छता आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याचेही निर्देश देण्यात आले.

कार्तिकी यात्रा सुरळीत व सुरक्षित पार पाडण्यासाठी सर्व विभागांनी २४ तास सतर्क राहावे. कोणत्याही कामात दिरंगाई न करता नियमित आढावा घेऊन पूर्वतयारी निर्धारित मुदतीत पूर्ण करावी, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

थोडक्यात पण महत्वाचे

चक्रेश्वर पतसंस्थेच्या अध्यक्षपदी ॲड. योगेश लेंडघर, उपाध्यक्षपदी प्रमोद साळुंके

चाकण : दैनिक संध्या

रौप्यमहोत्सवी वर्षाकडे यशस्वीपणे वाटचाल सुरू असलेल्या आणि ऑडिट वर्ग अ मिळालेल्या चाकण, राणुबाई मळा येथील चक्रेश्वर नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी ॲड. योगेश शिवाजी लेंडघर यांची, तर उपाध्यक्षपदी प्रमोद किसन साळुंके यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. संदीप कानपिळे यांनी आपल्या अध्यक्षपदाचा, तर अनिल गोसावी यांनी उपाध्यक्ष पदाचा नियोजित कालावधी पूर्ण झाल्याने इतरांना या पदावर काम करण्याची संधी मिळावी म्हणून स्वखुशीने राजीनामा दिला होता. त्यामुळे ही दोन्ही पदे रिक्त झाली होती. अध्यक्ष व उपाध्यक्ष या दोन्ही पदासाठी निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली. अध्यक्षपदासाठी ॲड. लेंडघर यांनी, तर उपाध्यक्ष पदासाठी साळुंके यांनी अर्ज दाखल केला होता. या दोन्ही पदासाठी इतर कोणाचेही अर्ज दाखल झाले नसल्याने अध्यक्षपदी लेंडघर यांची तर, उपाध्यक्षपदी साळुंके यांची निवड झाल्याची अधिकृत घोषणा निवडणूक निर्णय अधिकारी बगाटे व संस्थेच्या सचिव जाहिरा मुंढे यांनी केली. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक ज्ञानेश्वर केळकर, संचालक लता घुमटकर, राजाराम जाधव, सविता शेवकरी, हेमंत बिरदवडे, सुरेश बिरदवडे, अनिल गोसावी, संदीप कानपिळे, अक्षय केळकर, रामदास बिरदवडे, सर्जेराव गोरे, सचिव जाहिरा मुंढे, प्रियंका जाधव उपस्थित होते. ॲड. योगेश लेंडघर यांची अध्यक्षपदी, तर प्रमोद साळुंके यांची उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल माजी सरपंच दत्तात्रय बिरदवडे, नगरसेवक हर्षद लेंडघर, नगरसेविका स्वाती लेंडघर, नगरसेवक विकास धाडगे, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते पांडुरंग गोरे, चाकण पतसंस्थेचे अध्यक्ष निलेश टिळेकर, उद्योजक हनुमंत मेदनकर, आदींच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.



रामदास आठवले यांची प्रा. जीवन जाधव, डॉ. रश्मी जाधव यांनी घेतली सदिच्छा भेट

मुंबई : दैनिक संध्या

केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता राज्यमंत्री तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांची महाराष्ट्र सचिव प्रा. जीवन जाधव आणि मुंबई विभागाच्या उपाध्यक्षा डॉ. रश्मी जीवन जाधव यांनी सदिच्छा भेट घेतली. यावेळी त्यांनी आठवले यांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा देऊन सणाच्या निमित्ताने शुभेच्छांची देवाणघेवाण केली. या सदिच्छा भेटीदरम्यान प्रा. जीवन जाधव आणि डॉ. रश्मी जाधव यांनी आठवले यांच्याशी संवाद साधत त्यांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. सामाजिक न्याय, समता आणि वंचित घटकांच्या हक्कांसाठी कार्यरत असलेल्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) या पक्षाच्या संघटनात्मक आणि सामाजिक कार्याच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्त्वपूर्ण मानली जात आहे. प्रा. जीवन जाधव हे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाचे महाराष्ट्र सचिव म्हणून, तर डॉ. रश्मी जीवन जाधव या मुंबई विभागाच्या उपाध्यक्षा म्हणून पक्षाच्या कार्यात योगदान देत आहेत.



शिस्त, वेळ आणि पैशांचे व्यवस्थापन ही यशाची गुरुकिल्ली : मनीषा तपस्वी

पिंपरी : दैनिक संध्या

समाजाला भेडसावणाऱ्या समस्येवर उपाय शोधून त्याचे संधीत रूपांतर करणे म्हणजे यशस्वी उद्योजकता आहे. शिस्तबद्धता, वेळ आणि पैशांचे व्यवस्थापन ही यशस्वी होण्याची गुरुकिल्ली आहे असे मार्गदर्शन दे आसरा फाउंडेशन च्या व्यवस्थापक मनीषा तपस्वी यांनी केले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट मध्ये उद्योजकता सेल आणि दे आसरा फाउंडेशन यांच्या वतीने 'यशस्वी उद्योजक' ही उद्योजकता कौशल्य विकसित करण्यासाठीची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी दे आसरा फाउंडेशन व्यवस्थापक मनीषा तपस्वी, स्नेहा दिवेकर, एसबीपीआयएम संचालक डॉ. कीर्ती धारवाडकर आदी उपस्थित होते. दे आसरा च्या स्नेहा दिवेकर यांनी सांगितले की, जर तुम्हाला तुमच्या आवडीच्या गोष्टी करायच्या असतील, तर कोणासोबतही काम सुरू करा, त्यांना मदत करा, अनुभव घ्या आणि मग तुमचा व्यवसाय सुरू करा. उद्योजक मानसिकता हा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे; सर्व काही मानसिकतेवर अवलंबून असते. भारतात अनेक कल्पना आहेत, तुम्हाला तुमच्या सभोवतालचे निरीक्षण करून स्वतःचा वैयक्तिक ब्रँड तयार करावा. पुढे ५ वर्षांनंतर तुम्हाला काय बनायचे आहे, ते लिहून काढा आणि त्यावर काम करा. वेळ वाया न घालवणे. इतरांशी संपर्क साधने आणि सहकार्य करणे हे गुण उद्योजकतेला पूरक आहेत. ज्ञानेश्वर लांडगे, पद्माताई भोसले, विठ्ठल काळभोर, शांताराम गराडे, हर्षवर्धन पाटील, नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

पुण्यात आयोजित होणार आंतरराष्ट्रीय सर्कस महोत्सव

■ जेजुरी (दै. संध्या)

पुण्यात ५ ते १५ नोव्हेंबर दरम्यान व्हिएतनाम, मॅक्सिको, इथिओपिया, नेपाळ आणि भारत या पाच देशांतील सर्कस कलावंत आंतरराष्ट्रीय सर्कस महोत्सव सादर करणार आहेत. प्रसिद्ध रॅम्बो सर्कसने याचे आयोजन केले आहे. देशातील प्रमुख शहरांमध्ये रॅम्बो सर्कसतर्फे हा आंतरराष्ट्रीय सर्कस महोत्सव वर्षभर साजरा केला जाणार आहे. बंतरा भवन, सर्व्हे नं. १०४/१, मर्सिडीज शोरूमजवळ, मुंबई-बंगळुरू हायवे, बाणेर, पुणे येथे सर्कस शो होतील.

पुण्यातील या दहा दिवसांच्या आंतराष्ट्रीय सर्कस महोत्सवात दुपारी १:००, दुपारी ४:०० आणि सायंकाळी ७:०० असे सर्कस शो होणार असून तिकीट दर रु. ५०० पासून पुढे आहे. याची तिकिटे बुक माय शो आणि प्रत्यक्ष सर्कस ठिकाणी मिळू शकतील. ८३०६४३०६४३ या क्रमांकावर देखील बुकिंग करता येऊ शकेल अशी माहिती आयोजक रॅम्बो सर्कसचे पार्टनर सुजित दिलीप यांनी दिली.

पुण्यात प्रथमच होणाऱ्या आंतरराष्ट्रीय सर्कस महोत्सवामुळे पुणे शहर एका भव्य सादरीकरणाचा साक्षीदार ठरणार आहे. व्हिएतनाम, मॅक्सिको, इथिओपिया, नेपाळ आणि भारत या देशांतील कलाकारांचा समावेश असलेल्या या सर्कस महोत्सवात धाडसी शारीरिक कसब, श्वास रोखून धरणारे हवाई प्रयोग, अद्भुत संतुलन आणि आधुनिक सर्कस मनोरंजनाचा अनोखा संगम पाहायला मिळणार आहे.

पारंपारिक सर्कसच्या चौकटीपलीकडे जात हा महोत्सव जगातील विविध कला परंपरा आणि विशेष कौशल्ये असलेल्या कलाकारांना एकाच व्यासपीठावर आणतो. या आंतरराष्ट्रीय सर्कस महोत्सवामध्ये अचूकता, शक्ती, लवचिकता आणि अनेक वर्षांचा सराव यांचा मिलाफ असलेली प्रात्यक्षिके सादर केली जातील. पुणेकरांना आधुनिक सर्कस कलेची ही विविधता एकाच छताखाली अनुभवण्याची संधी मिळणार आहे.विशेष



आकर्षणांमध्ये व्हिएतनामी कलाकारांचे जार बॅलन्सिंग (भांड्यांचे संतुलन) आणि हवाई पट्ट्यांवरील (aerial straps) ड्युओ ॲक्ट्स यांचा समावेश आहे. इथिओपियाचे कलाकार पोल शोल्डर बॅलन्सिंग आणि ड्युओ फ्रेम्सद्वारे त्यांची ताकद अन् समन्वयाचे प्रदर्शन करतील, तर मॅक्सिकन कलाकार केस बांधून हवेत लटकण्याच्या (hair hanging) धाडसी कलेद्वारे मानवी संतुलन आणि नियंत्रणाच्या सीमा ओलांडतील. नेपाळचे कलाकारही या महोत्सवाच्या वैविध्यपूर्ण सादरीकरणात आपली कला जोडतील.

या कार्यक्रमात विदूषकांचे एक नवीन रूप पाहायला मिळेल. ज्यामध्ये सर्व वयोगटातील प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यासाठी हास्य विनोद, शारीरिक हालचालींचा विनोद आणि अनपेक्षित क्षण यांचा समावेश असेल. हाय-एनर्जी स्लिंकी परफॉर्मन्स, आकर्षक एलईडी डान्स ॲक्ट्स, गुरुत्वाकर्षणाला आव्हान देणारे हवाई प्रयोग आणि प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेणारे ॲक्रोबॅटिक्स या महोत्सवाच्या कार्यक्रमाची शोभा आणखी वाढवतील.

रॅम्बो सर्कससाठी 'आंतरराष्ट्रीय सर्कस महोत्सव' म्हणजे विविध संस्कृतींमधील सर्कस कलेचे कौशल्य, शिस्त आणि सर्जनशीलतेचा उत्सव आहे. निरनिराळ्या देशांतील कलाकारांना एकत्र आणून प्रेक्षकांना आंतरराष्ट्रीय सर्कस परंपरांची ओळख करून देणे आणि आधुनिक स्वरूपात थेट मनोरंजन सादर करणे हा या महोत्सवाचा उद्देश आहे.कुटुंब, मुले आणि सर्व वयोगटातील प्रेक्षकांसाठी डिझाइन केलेली पुण्याची ही आवृत्ती एका रोमांचक थेट अनुभवाचे आश्वासन देते, जिथे शारीरिक कलात्मकता, हास्य वैभव आणि आंतरराष्ट्रीय प्रतिभा केंद्रस्थानी असेल.

धन्वंतरी पूजनातून निरोगी भविष्यासाठी आयुर्वेदाचा संदेश

■ पुणे (दै. संध्या)

निरोगी जीवनशैली, रोगप्रतिबंध आणि सर्वांगीण आरोग्यासाठी आयुर्वेदाचे महत्त्व अधोरेखित करत 'उद्याच्या निरोगी भविष्यासाठी आयुर्वेद' या संकल्पनेवर आधारित धन्वंतरी पूजनाचा कार्यक्रम विश्वानंद केंद्राच्या वतीने आयोजित करण्यात आला. आयुर्वेद हा केवळ उपचाराचा मार्ग नसून निरोगी आणि संतुलित जीवनशैलीचा आधार असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

सातव हॉल, अरण्येश्वर, पुणे येथे हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. मीना पाटणकर उपस्थित होत्या. विश्वानंद केंद्राचे संस्थापक विश्वस्त राजकुमारजी चोरडिया तसेच मेडिकल डायरेक्टर डॉ. अजितकुमार मंडलेचा यांची प्रमुख उपस्थिती होती. वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर, आरोग्यसेवक, आणि नागरिक यावेळी उपस्थित होते.



यावेळी भगवान धन्वंतरी यांचे विधिवत पूजन करून सर्वांच्या उत्तम आरोग्याची व निरोगी जीवनाची प्रार्थना करण्यात आली. विश्वानंद केंद्राच्या विश्वानंद केंद्राचे पदाधिकारी, कर्मचारी माध्यमातून आयुर्वेद, आधुनिक वैद्यकशास्त्र, फिजिओथेरपी, योग आणि इतर पूरक उपचारपद्धतींचा समन्वय साधून सर्वांसाठी एकात्मिक आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

ऑन-स्क्रीन प्रवासाला खास बनवणाऱ्या नात्यांचा उत्सव साजरा केला

■ मुंबई (दै. संध्या)

टेलिव्हिजन शोमध्ये एकत्र काम करताना कलाकार अनेकदा एकमेकांच्या जवळ येतात, पण कधी कधी त्यांच्यात निर्माण होणारं नातं हे केवळ सहकलाकारांपुरतं मर्यादित राहत नाही. सेटवर दीर्घकाळ एकत्र वेळ घालवणं, व्यस्त वेळापत्रक सांभाळणं, दैनंदिन क्षण एकत्र अनुभवणं आणि आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये एकमेकांच्या पाठीशी उभं राहणं, यामुळे व्यावसायिक नात्याचं रूपांतर कुटुंबासारख्या आपुलकीच्या नात्यात होऊ शकतं. यंदाच्या भाऊबीजेनिमित्त, सोनी सबचे कलाकार मुकुल हरीश, अक्षया हिंदाळकर आणि उर्वा सवालिया यांनी आपल्या सहकलाकारांमध्ये भावंडं कशी सापडली आणि सेटवर सुरू झालेलं नातं ऑफ-स्क्रीनही एका जिव्हाळ्याच्या नात्यात कसं बदललं, याबद्दल मनमोकळेपणाने सांगितलं.

पुष्पा इम्पॉसिबलमध्ये टायगरची भूमिका साकारणाऱ्या मुकुल हरीश यांनी सांगितले, "या शोमध्ये विश्वाची भूमिका साकारणारी जिया आणि मी पहिल्या दिवसापासून कदाचित सर्वाधिक वेळ एकत्र स्क्रीन शेअर केला आहे. माझ्या पात्राप्रमाणेच मी ऑफ-स्क्रीनही तिला 'शानी' असंच म्हणतो. आम्ही दोघेही जवळपास एकाच वेळी या शोमध्ये सामील झालो आणि आमच्यात लगेचच एक सुंदर नातं निर्माण झालं. मला वाटतं, आम्ही दोघेही अहमदाबादचे असल्यामुळे सुरुवातीपासूनच आमच्यात एक समान धागाही होता. कालांतराने आम्ही एकमेकांसोबत खूपच कम्फर्टेबल झालो आहोत आणि आमचं नातं अधिकाधिक घट्ट होत गेलं आहे. सेटवर ती मला धाकट्या बहिणीसारखी वाटते आणि जेव्हा एखाद्या व्यक्तीसोबत इतका कम्फर्ट असतो, तेव्हा तिच्यासोबत शूटिंग करणं हे काम वाटतच नाही."

सोनी सब कलाकारांनी जागवल्या बालपणीच्या दिवाळीच्या आठवणी

■ मुंबई (दै. संध्या)

दिवाळी हा नेहमीच कौटुंबिक परंपरा, सणासुदीचे पदार्थ, नवीन कपडे आणि उत्सव संपल्यानंतरही मनात कायम राहणाऱ्या आठवणींनी भरलेला सण राहिला आहे. काळानुसार दिवाळी साजरी करण्याच्या पद्धती बदलल्या असतील, पण बालपणीच्या दिवाळीच्या आठवणींचे स्थान नेहमीच खास असते. यंदाच्या दिवाळीनिमित्त सोनी सबचे कलाकार करुणा पांडे, मुकुल हरीश, विवाना सिंग आणि जितेन लालवानी यांनी त्यांच्या बालपणातील सर्वात सुंदर आठवणींना उजाळा दिला आणि या सणाला त्यांच्यासाठी खास बनवणारे क्षण शेअर केले.

पुष्पा इम्पॉसिबलमध्ये पुष्पाची भूमिका साकारणाऱ्या करुणा पांडे यांनी सांगितले, "माझ्या बालपणीच्या दिवाळीच्या आठवणी खूप खास आहेत, कारण माझे वडील संरक्षण दलात होते. त्यामुळे आम्ही दर काही वर्षांनी वेगवेगळ्या शहरांमध्ये हा सण साजरा करत असू. मला आठवतं, आम्ही आमचं घर पणत्या आणि रोषणाईने सजवत असू आणि आमच्या घरी अनेक पाहुणे येत असत. फटाके फोडणे आणि आईने बनवलेल्या स्वादिष्ट पदार्थांचा आस्वाद घेणे हा माझा सर्वात आवडता भाग होता.

लहानपणी आमच्यासाठी सर्वात मोठा उत्साह म्हणजे पूजा संपण्याची वाट पाहणे, जेणेकरून आम्ही अखेर मिठाई आणि सणासुदीच्या खास पदार्थांचा आनंद घेऊ शकू. आई-वडील आणि बहिणीसोबत साजरी केलेली ती दिवाळी आजही माझ्या मनात कायम आहे आणि त्या आठवणी मी आयुष्यभर जपून ठेवेन." पुष्पा इम्पॉसिबलमध्ये टायगरची भूमिका साकारणारे मुकुल हरीश यांनी सांगितले, "दिवाळी माझ्यासाठी तेव्हाही आणि आजही एक जादुई अनुभव आहे.

समाजात कायदेशीर साक्षरतेची नितांत गरज

विद्याधर अनास्कर ; कसबा पेठेत कायदेशीर सल्ला आणि समुपदेशन केंद्राचे उद्घाटन

■ पुणे (दै. संध्या)

कोणत्याही वाद्यामध्ये न्याय हा न्यायालयातच मिळाला पाहिजे, अशी धारणा आज समाजामध्ये दृढ होत आहे, परंतु न्यायालयाऐवजी समुपदेशन करून परस्परांमध्ये सुसंवाद साधून न्याय मिळणे गरजेचे असते. सध्या मात्र न्याय मिळण्यासाठी न्यायालय हा पर्याय पहिल्यांदा निवडला जातो, त्यामुळे मोठ्या प्रमाणावर न्यायव्यवस्थेवर ताण आला आहे आणि त्यातच सर्वसामान्यांमध्ये आपल्या मूलभूत हक्कांचा संदर्भात अज्ञान आहे. अशा परिस्थितीमध्ये समाजामध्ये कायदेशीर साक्षरतेची सध्या नितांत गरज आहे, असे मत महाराष्ट्र राज्य सहकार बँकेचे मुख्य व्यवस्थापक ऍड विद्याधर अनास्कर यांनी व्यक्त केले.

द चेंबर्स तर्फे कसबा पेठ येथील पवळे चौक येथे उभारण्यात आलेल्या



कायदेशीर सल्ला आणि समुपदेशन केंद्राचे उद्घाटन ॲड. विद्याधर अनास्कर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. त्यावेळी ते बोलत होते. निवृत्त जिल्हा न्यायाधीश अभय शिरसीकर, ॲड.चंद्रशेखर घाटे, डॉ. स्मिता जोशी आदी यावेळी उपस्थित होते.

ॲड. विद्याधर अनास्कर म्हणाले, भारतामध्ये न्यायव्यवस्था अत्यंत शिथिल गतीने काम करत आहे . त्यामुळे कोट्यावधी लोक न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. हजारो लोकांची हयात जाते, परंतु त्यांना न्याय मिळत नाही, त्यामुळे न्यायालयाची पायरी चढूच नये अशी भावना सर्वसामान्यांमध्ये तीव्र झाली आहे. अशावेळी न्यायालयामध्ये जाण्यापूर्वीच वादाचे निराकरण हे अशा प्रकारच्या कायदेशीर सल्ला आणि समुपदेशन केंद्रामध्ये झाले तर सर्वसामान्यांना लवकर न्याय मिळू शकेल. अभय शिरसीकर म्हणाले, न्यायव्यवस्था शिथिल पद्धतीने काम करते हे सर्वांना दिसते. परंतु त्यामागील परिस्थिती लोकांना माहिती नाही. सर्वोच्च न्यायालयांमध्ये सध्या केवळ ३८ न्यायाधीश आहेत त्यांच्याकडे ९५ हजार खटले प्रलंबित आहेत, उच्च न्यायालयामध्ये ११२२ न्यायाधीश आहेत, त्यांच्याकडे ६५ लाख खटले प्रलंबित आहेत. तर जिल्हा न्यायालयांमध्ये २२ हजार न्यायाधीशांकडे पाच कोटी खटले प्रलंबित आहेत. अशा परिस्थितीमध्ये न्यायव्यवस्था कशी जलद होणार? यासाठी सर्वजण बोलतात. परंतु कार्यवाही मात्र कोणीही करत नाही.

सोनी सब च्या पुष्पा इम्पॉसिबलच्या सेटवर दिवाळीचा उत्साह

कलाकारांनी खाद्यपदार्थ, धमाल आणि एकत्र येण्याच्या आनंदासह साजरा केला सण

■ मुंबई(दै. संध्या)

सोनी सबचा पुष्पा इम्पॉसिबल हा शो पुष्पा (करुणा पांडे) हिच्या कौटुंबिक आयुष्यातील चढ-उतार, नातेसंबंध आणि अनपेक्षित आव्हानांमधील प्रवासाची कहाणी पुढे नेत आहे. टायगर (मुकुल हरीश) हा पुष्पाचा जैविक मुलगा असल्याचे सर्वांना समजल्यानंतर, चिराग (नितीन बाबू) आणि टायगर यांच्यातील तणाव आणखी वाढला आहे.

मात्र पडद्यावर पुष्पाच्या आयुष्यात अनेक समस्या सुरू असतानाच, पडद्यामागे कलाकारांनी सेटवर एकत्र येत दिवाळी साजरी केली. सणासुदीचे पोशाख, स्वादिष्ट खाद्यपदार्थ आणि भरपूर धमाल यामुळे हा उत्सव अधिक खास बनला. कलाकारांसाठी हा उत्सव म्हणजे कामातून मिळालेला एक आनंददायी विरंगुळा आणि एकमेकांसोबत वेळ घालवण्याची संधी होती. करुणा पांडे, मुकुल हरीश आणि मुस्कान बामणे यांनी दिवाळी एकत्र साजरी करण्यातील त्यांचा आवडता भाग शेअर केला.

पुष्पाची भूमिका साकारणाऱ्या करुणा पांडे यांनी सांगितले, "दिवाळीमधला माझा सर्वात आवडता भाग म्हणजे माझ्या आजूबाजूचा परिसर सजवणं. त्यामुळे घर असो किंवा सेट, खूप सकारात्मकता आणि उबदारपणा निर्माण होतो असं मला वाटतं. आम्ही खूप सारे दिवे लावले आणि मी एक सुंदर रांगोळीही काढली. सणासुदीच्या या छोट्या-छोट्या परंपरांचा मला खूप आनंद मिळतो आणि त्यामुळे सेलिब्रेशन आणखी खास वाटतं."

टायगरची भूमिका साकारणाऱ्या मुकुल हरीश यांनी सांगितले, "सेटवर




दिवाळी साजरी करण्याचा सर्वात खास भाग म्हणजे नक्कीच खाद्यपदार्थ होते. तिथे मिठाईचे खूप प्रकार होते आणि मी जवळपास सगळ्यांचाच आस्वाद घेतला. दिवाळीच्या काळात मिठायांपासून दूर राहणं खूप कठीण असतं, विशेषतः जेव्हा तुमच्या आजूबाजूला इतक्या मिठाया असतात. आम्ही सगळ्यांनी एकत्र सण साजरा करत, पदार्थांची देवाणघेवाण करत आणि सणाच्या उत्साहाचा आनंद घेत खूप छान वेळ घालवला. सेटवरचा तो खरोखरच खूप मजेदार दिवस होता."

शनायाची भूमिका साकारणाऱ्या मुस्कान बामणे यांनी सांगितले, "मला सणांसाठी छान तयार व्हायला खूप आवडतं, त्यामुळे सेटवरील दिवाळी माझ्यासाठी खूपच उत्साहवर्धक होती. सगळेच खूप सुंदर तयार झाले होते आणि संपूर्ण सेटवर सणाचा अतिशय आनंदी माहोल होता. आम्ही सगळेजण एकत्र आलो, फोटो काढले, खूप स्वादिष्ट पदार्थांचा आस्वाद घेतला आणि एकमेकांसोबत वेळ घालवण्याचा आनंद लुटला. जणू एखादं मोठं कुटुंब एकत्र येऊन दिवाळी साजरी करत आहे, असंच वाटत होतं आणि मी त्या दिवसाचा मनापासून आनंद घेतला."



दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
सोमवार, दि. ९ नोव्हेंबर २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



थोडक्यात पण महत्वाचे



ग्रामीण संस्थेचे कार्य प्रेरणादायी - ॲड.भालेराव

वाल्हे : दैनिक संध्या

सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि आपुलकी जपणे हीच खरी काळाची गरज आहे . पुरंदर हवेलीतील मुस्लिम बांधवांना दीपावली निमित्त फराळ वाटप करून ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी संजय जगताप यांनी सामाजिक ऐक्याचा एक उत्तम आदर्श घालून दिला आहे. या संस्थेचे सामाजिक कार्य अत्यंत कौतुकास्पद आणि प्रेरणादायी आहे, असे गौरवशाली उद्गार ज्येष्ठ विधीतज्ञ विजय भालेराव यांनी काढले. वाल्हे (ता. पुरंदर) येथे ग्रामीण संस्थेच्या वतीने मुस्लिम बांधवांना दिवाळीच्या फराळाचे वाटप करण्यात आले, यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. विजय भालेराव पुढे म्हणाले की, "सण आणि उत्सव हे आनंद वाटण्यासाठी असतात. जात, धर्म आणि पंथाच्या भिंती ओलांडून जेव्हा आपण एकमेकांच्या आनंदात सहभागी होतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने समाज सशक्त होतो. ग्रामीण संस्थेच्या अशा उपक्रमांमुळे आपापसातील प्रेम आणि विश्वास अधिक दृढ होतो." या प्रसंगी वाल्हे गावचे उपसरपंच सागर भुजबळ सामाजिक कार्यकर्ते नाना दाते आरपीआयचे शाखाध्यक्ष शैलेंद्र भोसले यांसह चांदभाई शेख मौलाना मोहम्मद सोहेल अख्तर राजू इनामदार अमोल भुजबळ अजय कुदळे कुणाल भुजबळ शौकत शेख आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. तर फराळ वाटपाच्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल मुस्लिम बांधवांच्या वतीने असलम नदाफ यांनी ग्रामीण संस्थेचे आणि आयोजकांचे मनःपूर्वक आभार मानले.



खराबवाडी येथे दुधाच्या टँकरला गळफास घेऊन चालकाची आत्महत्या

चाकण : दैनिक संध्या

दुधाच्या टँकरवरील लोखंडी सीडीला टॉवेलच्या साह्याने गळफास लावून चालकाने आत्महत्या केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. चाकण-तळेगाव दाभाडे रस्त्यावरील खराबवाडी हद्दीतील नाफेडच्या मोकळ्या जागेसमोर शनिवारी उशिरा हा प्रकार समोर आला. परमेश्वर राजेभाऊ शिंदे (वय ३१, सध्या रा. मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे. मूळ रा. होळ, ता. केज, जि. बीड) असे आत्महत्या केलेल्या चालकाचे नाव आहे. परमेश्वर याच्या भावाने दक्षिण महाळुंगे इंगळे पोलीस ठाण्यात याबाबत फिर्याद दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय ढमाळ व पोलीस निरीक्षक अनिल देवडे यांनी याबाबत माहिती दिली. परमेश्वर हा मंचर येथील एका दुध डेअरीच्या दुधाच्या टँकरवर चालक म्हणून काम करत होता. खराबवाडी येथे शुक्रवारी रात्री त्यांनी दुधाचा टँकर रस्त्याच्या कडेला उभा केला होता. त्यानंतर मध्यरात्री दुधाच्या टँकरवर चढण्यासाठी असलेल्या लोखंडी शिडीला टॉवेलच्या साह्याने गळफास लावून आत्महत्या केली. दक्षिण महाळुंगे पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून त्याचा मृतदेह चाकण ग्रामीण रुग्णालयात पाठविला आहे. आत्महत्येचे नेमके कारण निष्पन्न झाले नसून पोलिसांनी या घटनेची आकस्मित मयत अशी नोंद केली आहे. अधिक तपास सुरू आहे.



पुरंदरच्या 'सुनबाई' आमदारांची साकुर्डेत घोड्यावरून मिरवणूक!

पुरंदर : दैनिक संध्या

पदवीधर शिक्षक मतदारसंघाच्या आमदारपदी निवड झाल्यानंतर पुरंदरच्या पहिल्या महिला आमदार हर्षदा सस्ते-जाधव यांचे साकुर्डे या सासरच्या गावी आगळ्यावेगळ्या पद्धतीने जंगी स्वागत करण्यात आले. गावच्या सुनबाई आमदार झाल्याचा आनंद व्यक्त करण्यासाठी समस्त साकुर्डे ग्रामस्थ एकवटले. पारंपरिक पद्धतीने घोड्यावरून त्यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली, तर जेसीबीच्या माध्यमातून त्यांच्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली. जागोजागी सत्कार, ढोल-लेझीमचा गजर, डीजेचा दणदणाट आणि फटाक्यांच्या आतषबाजीने संपूर्ण गावात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते. या प्रसंगी माजी सनदी अधिकारी प्रभाकर देशमुख, शिक्षण संचालक विनोद जाधव, उद्योजक शिक्षण सम्राट कल्याण सस्ते उदयनाना जगताप, एम एस जाधव सभापती निलेश जगताप, साकुर्डे सरपंच राजेंद्र जाधव, राजेंद्र बरकडे, माई सस्ते सुरेश सस्ते, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्तिथ होतें. आपल्या गावच्या सुनबाई आमदार झाल्याचा अभिमान आणि आनंद ग्रामस्थांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता. गावातील महिला, पुरुष, युवक, ज्येष्ठ नागरिक अशा सर्वांनी या स्वागत सोहळ्यात उत्स्फूर्त सहभाग घेतला. संपूर्ण गाव एकत्र येत जणू दिवाळीच साजरी करत असल्याचे चित्र यावेळी पाहायला मिळाले.

स्वर सागरात न्हाली जयाद्री पंचक्रोशीची दिवाळी पहाट!

भक्तिगीत, भावगीतांच्या सुरांनी रसिक मंत्रमुग्ध; संगीतसम्राट प्रथमेश मोरे यांच्या सुमधुर स्वरांनी जिंकली जेजुरीकरांची मने



■ पुरंदर (दै. संध्या)

दिवाळीच्या मंगलमय, भक्तिमय आणि भावस्पर्शी वातावरणात स्वरांच्या सागरात जयाद्री पंचक्रोशीतील जेजुरीकर अक्षरशः न्हाऊन निघाले. जयाद्री मित्र परिवाराच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'दिवाळी पहाट' या संगीतमय कार्यक्रमाने पहाटेच्या प्रसन्न वातावरणात सुरांची अनोखी मैफल रंगवली. संगीतसम्राट प्रथमेश मोरे यांच्या सुमधुर संगीत रचनांनी आणि सुरेल गीतांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले.

जेजुरीची ग्रामदेवता जानाईदेवीच्या चैतन्यमय भूमीत या दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पहाटे पाच वाजल्यापासून सुरू झालेल्या या स्वरमयी प्रभातीत भावगीते, भक्तिगीते आणि विविध संगीतमय रचनांनी रसिकांच्या मनाचा ठाव घेतला. विशेष म्हणजे, आधुनिक संगीतवाद्य असलेल्या सॅक्सोफोनच्या सुरेल साथीवर अभंगांच्या रचना सादर करून संगीतसम्राट प्रथमेश मोरे यांनी उपस्थितांची विशेष दाद मिळवली.

पहाटेच्या भक्तिमय सुरांनी सुरू झालेली ही संगीत मैफल पुढे भावगीतांच्या भावस्पर्शी सादरीकरणाने अधिक रंगतदार झाली. त्यानंतर लावणीच्या ठेक्याने कार्यक्रमात उत्साहाची भर पडली. सकाळी आठ वाजेपर्यंत रंगलेल्या या सुरेल मैफलीत रसिकांनी गाण्यांचा मनमुराद आनंद लुटला.

या कार्यक्रमाचे मधुर गायन कविता जावळेकर, अमोल यादव आणि ओंकार पवार यांनी केले. तर ऋषिकेश गुरव, स्वस्ति मोरे, स्वयंम सोनवणे आणि ओंकार पवार यांनी विविध वाद्यांची सुरेल साथ देत कार्यक्रमाची रंगत वाढवली. अभिनेता पराग चौधरी यांनी आपल्या खुमासदार सूत्रसंचालनातून कार्यक्रमात रंगत आणली.

जयाद्री मित्र परिवाराचे गणेश टाक, अतुल आगलावे, रमेश सोनवणे, राहुल मंगवानी, धनंजय केळकर, प्रसन्न शहा, सचिन झगडे, मिलिंद क्षीरसागर, कुमार पवार, विलास कड यांच्यासह महिला सदस्य गीता टाक, अर्चना क्षीरसागर, वासंती पवार, वैशाली आगलावे, पल्लवी केळकर, सारिका झगडे, गीता मंगवानी, पल्लवी नाझिरकर आणि रुपाली कड यांनी कार्यक्रमाच्या आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

तसेच गौतमी, श्रेया, शरयू आणि सिद्धी या चिमुकल्यांच्या सहभागाने दिवाळी पहाट कार्यक्रमाला वेगळीच शोभा आली. परंपरा, संस्कृती आणि संगीताचा सुरेल संगम साधत जयाद्री मित्र परिवाराने दिवाळी पहाटेची सांस्कृतिक परंपरा यंदाही उत्साहात जपली. भक्ती, संगीत आणि आनंदाच्या स्वरांनी न्हालेली ही दिवाळी पहाट जेजुरीकरांच्या स्मरणात राहणारी ठरली.

धनत्रयोदशी दिवशी कवी साहित्यिकांनी अक्षरधन पूजन करावे – साहित्यिक विनोद अष्टुळ

■ हडपसर (दै. संध्या)

शुभ दीपावली सणामध्ये धनत्रयोदशी म्हणजे सोने, चांदी अशा धनाच्या पूजनासोबत आरोग्य धनसंपदेचीसुद्धा लोकं पूजा करतात. कारण हा दिवस भगवान धन्वंतरी जयंती दिवस आहे. याच चतुर्भुज भगवान धन्वंतरीने एका हातात आरोग्यमय जीवनाचा अमृत कलश तर दुसऱ्या हातात पुस्तकसुद्धा घेतले आहे. म्हणजे धनसंपत्ती, निरामय आरोग्यासह अक्षरधनाचा शोध घेण्यासाठी कवी साहित्यिकांना आज काव्यसंग्रह प्रकाशन सोहळा लाभला आहे. असा हा अमृतयोग हेच सांगतो आहे की साहित्यिकांनी धनत्रयोदशी दिवशी आपले अक्षरधन पूजन करावे असे विचार प्रमुख पाहुणे तथा चतुरस्त्र कवी विनोद अष्टुळ यांनी भाषणातून व्यक्त केले.

निरामय हडपसर साहित्य मंच आणि अभिनंदन प्रकाशन या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने भगवान धन्वंतरी पूजन तसेच कवी विजय कामथे यांच्या फुलपाकळ्या या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा स्व.विठ्ठल तुपे नाट्यगृह हडपसर येथे आयोजित केला होता. त्यावेळी अष्टुळ बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा तुपे नाट्यगृहाच्या संस्थापिका उज्वला ठाणगे, विशेष उपस्थिती हडपसर नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रमोद रणवरे, आधारस्तंभ हडपसर नाट्य परिषदेचे खजिनदार अमोल दुगाणे, प्रमुख पाहुणे साहित्य सम्राट पुणे संस्थेचे संस्थापक विनोद अष्टुळ, आयोजक



निरामय साहित्य मंचाचे अध्यक्ष डॉ.मनोज लडकत आणि काव्यसंग्रहाचे कवी.विजय कामथे व्यासपीठावर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात भगवान धन्वंतरीचे प्रत्येकाच्या शुभहस्ते पूजन तसेच महाराष्ट्र गीत गायनाने झाली. फुलपाकळ्या या काव्यसंग्रहाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाल्यानंतर कवी विजय कामथे सरांनी कविता सुचली कशी आणि फुलपाकळ्या काव्यसंग्रह तयार झाला कसा यावर अतिशय प्रांजळपणे प्रास्ताविकात आपले विचार मांडले. मान्यवरांच्या हस्ते कवीचा आणि उपस्थितांचा सन्मान करण्यात आला. मान्यवरांनी मनोगतातून शुभेच्छा दिल्यानंतर साहित्य सम्राट पुणे संस्थेचे २३१वे कवी संमेलन उपस्थित कवी कवयित्रींच्या बहारदार सादरीकरणाने संपन्न झाले. या कवी संमेलनामध्ये माननीय रमेश जाधव, प्रिया दामले, प्रा. डॉ.सुरेश वाळेकर, भरत माने, श्रीकांत ढोबळे, रमाकांत ढोबळे, डॉ.विलास बाबर, गोरक्षनाथ मोरे, किशोर कसबे, डॉ.राहुल भोसले, साहेबराव खामकर, दशरथ दुनघव, संजीवनी जगताप, नंदकिशोर गावडे, प्रा. शिवराज साने, प्रा.शिवाजी गायकवाड, प्रा.गौरव नेवसे, विनोद ताम्हाणे, डॉ.गणेश पुंडे, नानाभाऊ माळी, डॉ.मनोज लडकत, विजय कामथे आणि विनोद अष्टुळ अशा तीस शब्दप्रभूंनी आपल्या उत्स्फूर्त विविध विषयांवरील काव्यरचना सादर करून कार्यक्रमाची उंची वाढवली. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन आणि आभार डॉ.मनोज लडकत यांनी व्यक्त केले. शेवटी पसायदानाने कार्यक्रमाचे सांगता झाली.

पती-पत्नीचा मुलीसाठी पॅरेन्टींग प्लॅन; परस्परसंमतीने घटस्फोटाचा दावा निकाली

■ पुणे (दै. संध्या)

पती-पत्नी दोघेही आयटी कंपनीमध्ये नोकरीला आहेत. एकमेकांबरोबर मतभेद निर्माण होऊ लागल्यामुळे त्यांनी परस्परसंमतीने कोणताही वाद न घालता वेगळे व्हायचे ठरविले. आपल्या तुटणाऱ्या नात्याचा दहा वर्षीय लाडक्या मुलीवर परिणाम होऊ नये म्हणून दोघांनी मिळून तिचा सांभाळ करण्याचा पॅरेन्टींग प्लॅन ठरवून घेतला. मुलीच्या शिक्षणाचा संपूर्ण खर्च अर्धा-अर्धा वाटून घेतला.

तिचे शिक्षण अन् पालनाबाबतचे निर्णय एकत्र घेण्यापासून ते सुट्ट्या आणि सणासुदीला ती कधी आई किंवा बाबाबरोबर राहील, हे सुद्धा न भांडता ठरवून घेतले. मुलीवर तुटणाऱ्या नात्याचा परिणाम होऊ नये याची काळजी घेत पॅरेन्टींग प्लॅन ठरवून घेत परस्पर संमतीने घटस्फोटाचा दावा न्यायालयाने निकाली काढला. कौटुंबिक न्यायालयाच्या न्यायाधीश ए. बी. यादव यांनी हा निकाल दिला.

कौटुंबिक न्यायालयात दाखल होणाऱ्या घटस्फोटाच्या दाव्यांमध्ये मुंबई उच्च न्यायालयाने पॅरेन्टींग प्लॅनच्या गाईडलाइन्स घालून दिल्या आहेत. या दाव्यात पती-पत्नीने स्वतःहून मुलीच्या भविष्यासाठी आणि संगोपनासाठी केलेल्या पॅरेन्टींग प्लॅनचे न्यायाधीशांनी कौतुक केले. संबंधित अर्जदार पत्नीतर्फे ॲड. एस. के. जैन, ॲड. वंदना घोडेकर, ॲड. विंध्या पी, ॲड. अनम शेख यांनी काम पाहिले.

आयटी कंपनीत मोठ्या पदावर काम करत असलेले रमेश आणि स्मिता (दोघांची नावे बदलली आहेत) यांचा बारा वर्षांपूर्वी विवाह झाला होता. त्यांना दहा वर्षांची मुलगी आहे. मात्र गेल्या साडेचार वर्षांपासून त्यांच्यात मतभेद होऊ लागले आणि ते एकमेकांपासून वेगळे राहू लागले. त्यांची दहा वर्षीय मुलगी आईबरोबर राहत होती. जरी मतभेद झाले आणि वेगळे राहत असले तरी ते मुलीसाठी नियमित भेटत होते. तिच्या शिक्षणाकडे ते जबाबदार पालक म्हणून लक्ष देत होते. वेगळे झाल्यानंतर अखेर साडेचार वर्षांनी त्यांनी परस्परसंमतीने वेगळे व्हायचे ठरविले.

मुलीचा ताबा आईकडे राहील, असे दोघांमध्ये ठरले. मुलीच्या शिक्षणाचा खर्च अर्धा-अर्धा वाटून घेत, त्यासाठी बँकेत दरवर्षीच्या सुरुवातीला ठराविक रक्कम जमा करणे, तिच्या शिक्षणासंबंधी महत्त्वाचे निर्णय एकत्र घेणे, तिच्या सुट्ट्या आणि सणासुदीला आई किंवा बाबाबरोबर कधी राहील हे दोघांनी कोणताही वाद न घालता ठरवून घेतले.

आई किंवा वडील दोघांपैकी एकाचा मृत्यू झाला किंवा दोघांचाही मृत्यू झाल्यास मुलीचा ताबा ती सज्ञान होईपर्यंत कोणाकडे राहील, हे सुद्धा दोघांनी ठरवून घेतले. त्यानंतर पॅरेन्टींग प्लॅनचे मुद्दे परस्परसंमतीने घटस्फोटाच्या दाव्यात नमूद करून दावा दाखल केला. न्यायालयाने त्यांचा दावा मंजूर करून घटस्फोटाचा दावा निकाली काढला.

लक्ष्मीपूजनासाठी पुणेकरांची बाजारपेठांत तुफान गर्दी..! पूजा साहित्याच्या दरात १० ते १५ टक्क्यांची वाढ

■ पुणे (दै. संध्या)

दिपोत्सवानिमित्त शहरात आनंद अन् प्रकाशाचे पर्व सुरू झाले असून लक्ष्मीपूजनाच्या पूर्वसंध्येला शनिवारी (दि. ७) तुळशीबाग, महात्मा फुले मंडई, रविवार पेठ, बोहरी आळी, कसबा पेठ आणि कुंभारवाडा या प्रमुख बाजारपेठा ग्राहकांच्या गर्दीने भरून गेल्याचे पाहायला मिळाले. खरेदीसाठी नागरिक, महिला आणि व्यापारी वर्ग पूजा साहित्यासह घरगुती सजावटीच्या वस्तू खरेदी करण्यासाठी मोठ्या संख्येने बाहेर पडल्याचे चित्र पाहायला मिळाले.

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सायंकाळी घरोघरी आणि व्यापारी आस्थापने, बँकांमध्ये आद्यशक्ती श्रीलक्ष्मीदेवी, कुबेर आणि श्रीगणेशाची पूजा केली जाते. या पूजनासाठी लागणाऱ्या पारंपरिक व धार्मिक साहित्याची दुकाने पेठांमध्ये ठिकठिकाणी थाटण्यात आली होती.

लक्ष्मीची मूर्ती, केरसुणी (लक्ष्मी स्वरूप), लाह्या-बत्तासे, ऊस, आंब्याचे पान, केळीचे खांब अशा लक्ष्मीपूजनासाठी लागणाऱ्या पारंपरिक वस्तू खरेदी केली. वाहतूक खर्च आणि मागणी वाढल्याने साहित्याच्या दरात १० ते १५ टक्क्यांची किंचित वाढ झाली आहे. तरीही नागरिक उत्साहाने खरेदी करताना दिसत आहेत, अशी माहिती व्यापाऱ्यांनी दिली.

दिवाळीच्या रोषणाईसाठी रविवार पेठ आणि बुधवार पेठेतील इलेक्ट्रॉनिक्स बाजारात नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. घर, गॅलरी आणि दुकाने सजवण्यासाठी विविध प्रकारच्या लाईटच्या माळांना मागणी आहे. यंदा ग्राहकांचा कल चिनी बनावटीच्या स्वस्त माळांपेक्षा टिकाऊ आणि रंगीबेरंगी भारतीय 'एलईडी' माळांकडे जास्त दिसून येत आहे. बाजारात ५० पासून ते ८०० रुपयां पर्यंतच्या विविध डिझाइन्सच्या माळा उपलब्ध आहेत. यामध्ये वॉटरप्रूफ लाईट्स, पिक्सेल माळा, रांगोळी डिझाईन लाईट्स आणि पडद्यासारख्या माळांना विशेष पसंती मिळत आहे. गच्ची व बाल्कनीसाठी सौरऊर्जेवर चालणाऱ्या रोषणाई साहित्यालाही यंदा मागणी नोंदवली गेली आहे.



लक्ष्मीच्या मातीच्या आकर्षक मूर्ती आणि विविध डिझाइन्सच्या सुबक पणत्यांची कुंभारवाड्यात मोठ्या प्रमाणात विक्री झाली. घरोघरी धूप दाखवण्यासाठी लागणाऱ्या पारंपरिक मातींच्या धूपदाण्यांना ग्राहकांकडून विशेष पसंती मिळाली. लहान मुलांनी दिवाळीत उभारलेले किल्ले सजवण्यासाठी लागणाऱ्या मातीच्या प्रतिकृती, मावळे, प्राणी, रेडीमेड किल्ले आणि विविध चित्रांची खरेदी करण्यासाठी पालकांनी आणि मुलांनी कुंभारवाड्यात मोठी गर्दी केली होती.

घराची सजावट, तोरणे आणि लक्ष्मीपूजनासाठी लागणाऱ्या फुलांची मागणी वाढल्याने पुण्यातील मार्केट यार्डात फुलांची मोठी आवक झाली आहे. मात्र, यंदा प्रतिकूल हवामानाचा थेट फटका फुलांच्या दर्जाला बसल्याचे पाहायला मिळत आहे. बाजारात दाखल झालेल्या एकूण फुलांपैकी तब्बल ७५ टक्के फुले ही हलक्या प्रतीची असून, केवळ २५ टक्केच फुले चांगल्या दर्जाची आहेत. बाजारात प्रतवारीनुसार झेंडूला ६० ते ८० रुपये प्रति किलो, तर शेवंतीला ८० ते १२० प्रति किलो असा भाव मिळत आहे. झेंडूच्या माळा, आंब्याची पाने, तोरणे आणि पूजेच्या साहित्याच्या खरेदीसाठी ग्राहकांची मोठी लगबग होती.